छात्र

# प्रबोधन

मासिक पत्रक

वर्ष २, अंक ३

सौर आश्विन, शके १९१५

इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी, ने ज्योतिर्जगतात

## ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठीचे अभिनव मासिक !



### या अंकात काय दडलंय ?


- रहस्यकथा–तीन विद्यार्थ्यांचे साहस ४
- अभ्यासातील स्वावलंबन – प्रश्नकौशल्यांचा वापर ७
- चला $\pi$ ची किंमत काढू या ९
- प्रगतगावचा गणपती १०
- झुंजार विरांगना मादाम कामा १३
- वज्रासन व उष्ट्रासन १५
- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास १६
- असे घटते सुंदर अक्षर – भाग ३ १७
- पावसाळी सहली – धबधबे अन् जंगलातील चुकणेही .....! २१
- ओळख महाराष्ट्राची – धरणे २६
- असंही जगणं असतं ! २८
- स्वातंत्र्योत्तर भारताचा इतिहास ३१
- एक पापभिरू माणूस महात्मा कसा झाला ३४
- तेव्हाचे शिक्षण आत्ताचे यश ३५
- मुलांचे पान, कविता, विनोद इ.


## मित्र–मैत्रिणी–नातेवाईकांना दीपावली विशेषांक भेट द्या !

## तंबूतील शिबिर अन् गिरिभ्रमण

पुण्याजवळील निसर्गरम्य परिसरात, सह्याद्रीच्या कुशीत अन् जलाशयाच्या सान्निध्यात तंबूतील शिबिर अन् गिरिभ्रमणाचा कार्यक्रम !

**कालावधी : १९ ते २५ नोव्हेंबर १९९३**

**सर्वसाधारण कार्यक्रम :** ग्रामीण प्रश्नांचा अभ्यास, निसर्गपरिचय, आकाशदर्शन, पक्षी-वनस्पती निरीक्षण, गटकार्ये, चिठ्ठ्यांचा खेळ, विविध स्पर्धा, किल्ल्यांवर भटकंती आणि इतर अनेक गोष्टी.

### शिबिरातून काय मिळेल?

*भरपूर मजा... साहस... मैत्री... नवीन अनुभव... स्वत:च्या क्षमतांची ओळख... सामूहिक जीवनाचा आनंद... अडचणींवर मात करण्याची सवय...*

*या सर्वांसाठी शिबिरामध्ये आवर्जून सहभागी व्हा.*

**शुल्क :** रु. २५०/- (शिबिर काळातील प्रवास, भोजन, निवास इ. सह)

**नावनोंदणी :** ५ नोव्हेंबर पर्यंत समक्ष वा मनिऑर्डरने वा डिमांड ड्राफ्टने शुल्क भरून नावनिश्चिती करावी. शिबिरासंबंधीचे अन्य तपशील नावनोंदणी केल्यावर मिळतील/पोस्टाने पाठविले जातील.

टीप : हे शिबिर ८ वी ते ११ वी च्या मुलांसाठी (अर्थातच फक्त सभासदांसाठी) आहे. मुलींसाठी स्वतंत्र शिबिर नाताळच्या सुट्टीत होईल.

## आपल्याही गावामध्ये शिबिर होईल पण . . . . .

ज्या गावांमध्ये १०० पेक्षा अधिक सभासद असतील तेथे उन्हाळ्याच्या सुट्टीत 'छात्र प्रबोधन' द्वारा वासंतिक शिबिर घेतले जाईल. तसेच २० ऑक्टोबरपर्यंत ज्या गावचे सर्वात जास्त सभासद होतील तेथे सुमारे २०० वाचनीय पुस्तकांचे ग्रंथालय चालविले जाईल. आपल्या गावामध्ये शिबिर अन् ग्रंथालय व्हावे यासाठी तुम्ही सर्वजण प्रयत्न करणार ना! खाली २० सप्टेंबर अखेर ५० पेक्षा जास्त सभासद असलेल्या पुणे सोडून अन्य शहरातील सभासदांची संख्या दिली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| सोलापूर | ३९१ | सांगली | ३८५ |
| धुळे | २३० | अहमदनगर | १५६ |
| ठाणे | १४० | लातूर | १२६ |
| नाशिक | ५३ | औरंगाबाद | ५२ |

## स्मरण

- १० वी अभ्यास मार्गदर्शन : दुसरे पुष्प रविवार, १० ऑक्टोबर १९९३ रोजी ज्ञान प्रबोधिनी भवन, पुणे येथे सायं. ४ ते ७. सभासद नसलेल्यांसाठी शुल्क रु. १०/-
- कथास्पर्धा, चित्रस्पर्धा लक्षात आहे ना ! १० ऑक्टोबरपर्यंत आपली कथा अथवा चित्र पाठवावे.
- पत्रव्यवहार करताना पावती क्रमांक लिहिण्यास विसरू नका. अंकावरील पत्त्यावरच्या पहिल्या ओळीतील क्रमांक तुमचा पावती क्रमांक आहे.
- १० तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम पोस्टात चौकशी करा. नंतर आमच्याशी पत्रव्यवहार करा.
- आपले मासिक सौर महिन्यांप्रमाणे निघते. त्यामुळे एखादे मासिक आपल्याला मिळाले नसल्यास त्या मासिकाचा अंक क्रमांक व सौर महिना कळवावा. ऑगस्टचा अंक, सप्टेंबरचा अंक मिळाला नाही असे कळवू नये. त्याने गोंधळ वाढतो.

# ❀ संवाद ❀

प्रिय प्रबोधक मित्र-मैत्रिणींनो,

गणेशोत्सवाची धामधूम संपत असतानाच हा अंक तुमच्या हातात पडणार आहे. पुण्यामध्ये अन् त्यातही ज्ञानप्रबोधिनीमध्ये तर गणेशोत्सव म्हणजे उत्साहाला उधाण आलेले असते. ढोलताशांचा कडकडाट, झांजांचा खणखणाट अन् वरची नृत्याचा जोशपूर्ण अन् शिस्तबद्ध थयथयाट जणू अंगात वीरश्रीच निर्माण करत असतो. ८वी - ९ वी-१० वीतल्या मुलं-मुली तासन्तास मिरवणुकीत धुंद होऊन नाचत असतात. **आपण सर्वच प्रबोधकांनी असं स्वत:ला विसरून एखाद्या गोष्टीमध्ये झोकून देण्याचा अनुभव घेतला पाहिजे.** त्यातला आनंद अन् मजा अवर्णनीय असते.

पावसाळी सहली खूप छान झाल्या, पण या सहलींना फक्त पुण्यातलेच विद्यार्थी येऊ शकले होते. महाराष्ट्रभरातील सर्वांसाठीच दिवाळीच्या **सुट्टीतले तंबूतील शिबिर अन् गिरिभ्रमणाचा कार्यक्रम** म्हणजे एक उत्तम संधी आहे. सविस्तर माहिती सोबतच्या पानावर वाचालच, पण अधिकाधिक जणांनी लवकरात लवकर आपली नावनोंदणी करून निश्चिती करायची आहे. मुलींसाठी असं शिबिर नाताळच्या सुट्टीत घेणार आहोत.

२४ ऑक्टोबरला दसरा म्हणजे विजयादशमी आहे. एकमेकांना सोनं देऊन प्रेमाने आलिंगन देण्याचा हा दिवस, सीमोल्लंघनाचा, शिलंगणाचा हा दिवस ! पूर्वीच्या काळी या मुहूर्तावर चढाईला प्रारंभ होत असे. नवनवीन प्रदेश जिंकण्याच्या ईर्षेने सीमांचे उल्लंघन केले जात असे. **या वर्षीच्या विजयादशमीच्या निमित्ताने तुम्ही कोणत्या विजयी मोहिमेला प्रारंभ करणार?** कोणत्या सीमा ओलांडणार? एका गाण्यात म्हटले आहे.

**'मर्यादांनी मर्यादून छे ! त्यांना उल्लंघूनी, पुढे पुढे चालणे असू दे, हेच ध्येय तव मनी !'** स्वत:च्या उणीवा, मर्यादा ओळखून जाणीवपूर्वक त्या दूर करण्याचा प्रयत्न अन् संकल्प करावा. आपले प्रत्येक उत्सव असे शुभसंकल्पांचे, संस्कारांचे सिंचन करणारे व्हायला हवेत. असा एखादा संकल्प करून जरूर तो आम्हाला कळवा.

या अंकातील प्रत्येक पानावरच्या ओळी या स्वामी विवेकानंदांच्या आहेत. रोज एक ओळ दैनंदिनीत, वहीत, शाळेच्या सूचना फलकावर, वर्गातील फळ्यावर तुम्ही लिहावी. दिवसातली ५ मिनिटे शांत बसून त्यावर विचार करावा. अर्थ समजला नसल्यास तो शिक्षकांकडून वा मोठ्यांकडून समजावून घ्यावा.

एव्हाना या वर्षीचे दोन अंक तुमच्यापर्यंत पोहोचलेत. तुम्ही 'छात्र प्रबोधन'चे म्हणजे ज्ञान प्रबोधिनीचेही सभासद झाला आहात ! मात्र हे **सभासदत्वाचे नाते अधिक दृढ करण्यासाठी तुम्हालाही समर्थ व्हायला हवं.** प्रबोधकांकडून काय अपेक्षा आहेत हे या मासिकाच्या मागच्या पानावर (मलपृष्ठावर) एका पद्यातून व्यक्त केलं आहे ते समजावून घ्या.

सहामाही परीक्षेत उत्तम यश मिळविण्याच्या जिद्दीने तुम्ही सर्व आता येते महिनाभर अभ्यासाला लागालच. **त्यासाठी सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा !**

सस्नेह तुमचा,

महेन्द्र सेठिया

स्वामी विवेकानंदांच्या दिग्विजय शताब्दीच्या निमित्ताने ...

# हातात सुरी देण्याचीच तर क्षुल्लक बाब ........

११ सप्टेंबर १८९२ या दिवशी शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेत स्वामी विवेकानंदांनी 'माझ्या अमेरिकेतील बंधुभगिनींनो' हे शब्द उच्चारले आणि स्वामीजी जगातील कोट्यवधी लोकांच्या हृदयात जाऊन पोहोचले, पण त्या आधी सुमारे २।। ते ३ वर्षे स्वामीजी भारतभर हिंडत होते. देश, दोतील माणसे यांना निरखीत होते. त्यांचे दैन्य, अगतिकता पाहून त्यांच्या मनाला दु:ख होत होते पण त्याचबरोबर त्यांनी अभिमानाने जपलेला आपला सांस्कृतिक वारसा पाहून त्यांचे मन प्रसन्नही होत होते. स्वामीजींनी या भारतभ्रमणाच्या काळात जे अनुभवले त्याला त्यांचा प्रतिसाद म्हणजेच त्यांचे पुढचे आयुष्य होते.

पण स्वामीजींना भारतभ्रमण इतक्या सहजासहजी घडले नाही, अर्थात संन्याशाचे ते भारतभ्रमण म्हणजे काही तुम्ही आम्ही लक्झरी कोचमधून किंवा प्रथमश्रेणीच्या रेल्वे डब्यातून केलेला प्रवास नव्हता परंतु कष्टप्रद अशा या प्रवासासही शारदामाँची परवानगी नव्हती. तेव्हा स्वामीजींचे गुरु श्रीरामकृष्ण परमहंस यांनी समाधी घेतलेली होती. स्वामीजी व त्यांचे काही गुरुबंधू शारदामाँच्या बरोबर एकत्ररित्या आश्रमातील जीवन जगत होते. शारदामाँच्या प्रेमळ देखरेखीखाली ही सारी तरुण मंडळी त्यांच्या संन्यासी आयुष्याची भावी वाटचाल ठरवत होती. स्वामीजींच्या मनात मोठी प्रबळ इच्छा झाली ती देशाटन करण्याची पण देशाटनाला बाहेर पडायचे तर परवानगी घेतली पाहिजे. गुरुंचे निर्वाण झालेले तेव्हा गुरुपत्नीच गुरुस्थानी! अर्थातच स्वामीजींनी शारदामाँजवळ आपली ही इच्छा व्यक्त केली. पण शारदामाँनी हो किंवा नाही काहीच म्हटले नाही. त्या नंतरही स्वामीजींनी एकदोनदा हा विषय शारदामाँजवळ काढून पाहिला पण शारदामाँ मूकच राहिल्या. त्यांची परवानगी नाही असे समजून स्वामीजीही गप्प राहिले.

सगळ्यांचे रोजचे जीवन नेहमीप्रमाणे सुरू होते. आता तर भारतभ्रमणाचा विषय स्वामीजी विसरूनही गेले होते. एकदा स्वामीजी शारदामाँना स्वयंपाकात मदत करत होते. शारदामाँनी कामात मग्न असलेल्या स्वामीजींना म्हटले, ''अरे नरेंद्र जरा मला सुरी देतोस का?'' स्वामीजी उठले. सुरी घेतली व त्यांनी ती शारदामाँच्या हातात दिली. सुरी हातात घेऊन माँ त्यांना म्हणाल्या, 'नरेंद्र, जा तू. तुझी इच्छा आहे ना देशाटनाची. मग जा तू.'' स्वामीजींना कळेना. ''अरेच्या ! इतके दिवस माँ या विषयी एक चकार शब्द बोलायला तयार नव्हत्या आणि आज अचानक अशी परवानगी कशी दिली.'' त्यांनी नम्रपणे शारदामाँना तसे विचारले. तेव्हा शारदामाँ त्यांना म्हणाल्या, ''अरे नरेंद्र ! साधी सुरी देतानाही तू किती काळजीपूर्वक दिलीस. सुरीचे पाते तुझ्या हातात व मूठ माझ्या हातात दिलीस. मला सुरीने इजा होऊ नये यासाठी तू ही काळजी घेतलीस. माझी चिंता मिटली. तू जरी देशभर कोठेही हिंडलास तरी तू तुझ्या देशबांधवांशी हळुवारच वागशील. त्यांना दु:ख होईल असे शब्द तुझ्या तोंडून येणार नाहीत. त्यांना दु:ख होईल अशी कृती तुझ्याकडून घडणार नाही. आता निश्चींत मनाने मी तुला भारतभ्रमणाची परवानगी देते.''

स्वामीजी यानंतर भारतभ्रमणाला बाहेर पडले. ते आपल्या या सहजकृतीच्या मागचा शारदामाँना जाणवलेला मोठा अर्थ मनात घेऊन. ✿ ✿

## स्वामी विवेकानंद स्मृती – श्रीगणेशविसर्जन मिरवणूक

### संकल्पना



गेल्या शंभर वर्षात आपल्या या मातृभूमीला– भारत देशाला अनेकानेक महान सुपुत्र लाभले. स्वामी विवेकानंद हे त्यातील अग्रणी होत. शंभर वर्षांपूर्वी देश पारतंत्र्यात असताना हा योद्धा संन्यासी अमेरिकेत हिंदुस्थानाची महती ठणकावून सांगून आला. हे वर्ष त्या पुण्यस्मरणाचे आहे. भारत भ्रमणानंतर व पश्चिम दिग्विजयानंतर स्वामीजींनी सर्व भारतवासियांना मातृभूमीसाठी संघटित होण्याचा मूलमंत्र दिला. याच काळात लोकमान्य टिळकांनी लोकशक्तीचा उत्साह व ताकद विधायक मार्गाने संघटित करण्यासाठी गणेशोत्सव हा उपक्रम सुरू केला. शिकागो भाषणाच्या स्मरणाच्या निमित्ताने स्वामीजींचा मूलमंत्र आणि लोकमान्यांचा उपक्रम यांची सांगड घालण्याच्या दृष्टिकोनातून स्वामी विवेकानंद स्मृती श्रीगणेशविसर्जन मिरवणुकीची योजना आहे. गुरुवार दिनांक सौर १ आश्विन शके १९१५, २३ सप्टेंबर १९९३ रोजी सायं ३ ते ५ अशी ही मिरवणूक होईल.

पुण्यामध्ये या कल्पनेला सुमारे २१ शाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. २५०० ते ३००० विद्यार्थी–विद्यार्थिनी घोष–झांज–बरच्या. लेझीम इ. नृत्यप्रकार व घोषणा, पथनाट्य, स्फूर्तिगीते म्हणत या मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. स्वामी विवेकानंद व लोकमान्य टिळक यांचे एकत्र स्मरण अशा शिस्तबद्ध अन् उत्साहपूर्ण सहभागाने हे सर्व विद्यार्थी करणार आहेत. एक आदर्श मिरवणूक म्हणून निश्चितच ती सर्वांसमोर सादर केली जाईल. प्रत्यक्ष मिरवणुकीचा वृत्तांत पुढील अंकात येईलच. या निमित्ताने काढलेली चिंतनिका (किंमत रु. ५/), स्टिकर (रु. २/–), बिल्ले (रु. ३/), विवेकानंदांचे छायाचित्र (रु. ५/–), विवेकानंदांचे छायाचित्र (रु. ५/–), विवेकानंदांचे लॅमिनेशन केलेले छायाचित्र (रु. २०/– व रु. ३०/–) 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

* * *

### दु:खितांसाठी तुमचे हृदय कळवळू द्या !

*दु:खितांसाठी तुमचे हृदय कळवळू द्या आणि साहाय्यासाठी भगवंताची प्रार्थना करा. तुम्हाला साहाय्य मिळेलच मिळेल. डोक्यात हाच विचार वागवून आणि हृदयात याच चिंतेचा भार बाळगून बारा वर्षे मी वणवण फिरलो. तथाकथित मोठ्या आणि श्रीमंत लोकांचे मी उंबरठे उंबरठे झिजविले. हृदयाचे रक्त सांडीत सांडीत अर्धी पृथ्वी ओलांडून मदतीच्या शोधात मी ह्या परक्या देशात आलो. प्रभू अनंत शक्तिमान आहे, तो मला खचितच साहाय्य करील याची मला जाणीव आहे. या दूरच्या देशात उपासमारीने किंवा भयंकर थंडीने कदाचित मला मरण येईल, पण माझ्या प्रिय तरुणांनो, मी तुमच्यासाठी गरीब, अज्ञानी आणि दलित यांच्याविषयी सहानुभूतीचा आणि त्यांच्या उन्नतीसाठी प्राण पणास लावून प्रयत्न करण्याचा वारसा ठेवून जात आहे.*

***– स्वामी विवेकानंद***



# तीन विद्यार्थ्यांचे साहस

अनु. : विवेक पोंक्षे

१८९५ साल असावे ते. मी आणि शेरलॉक होम्स काही कारणांमुळे केंब्रिजच्या जवळपास राहण्यास आलो होतो. या ठिकाणी शेरलॉक होम्स मुख्यत: ग्रंथालयात जाऊन संशोधनासाठी काही वाचन करीत असे. खरे तर येथे 'सुप्रसिद्ध गुप्तहेर शेरलॉक होम्सच्या बुद्धीला ताण येईल असे काही घडण्याची शक्यताच नव्हती पण तसे घडायचे नव्हते.

त्या दिवशी संध्याकाळी श्रीयुत हिल्टन सोम्स आमच्या लॉजवर आले. ते आले तेच मुळी इतक्या प्रचंड गोंधळलेल्या मन:स्थितीत की बस. अर्थात तसे ते नेहमीच बारीकसारीक गोष्टींनीही उत्तेजित व्हायचे. अर्थात ते स्वाभाविकच होते म्हणायचे. कारण ते सेंट ल्यूक्स या कॉलेजात प्राध्यापक होते. प्राध्यापक म्हटल्यावर हे असे असायचेच. पण त्या दिवशीची त्यांची मन:स्थिती जरा जास्त विचित्र वाटत होती. काहीतरी फारच वेगळे घडले असावे.

आल्याआल्याच त्यांनी सुरुवात केली. ''श्रीयुत होम्स. तुम्ही येथे आलात हे माझे महद्‌भाग्य म्हणायचे. माझ्यासाठी तुम्ही तुमचा थोडासा तरी मौल्यवान वेळ काढू शकाल का?''

पण होम्सच्या वेळापत्रकात हे बसणारे नव्हते. त्याला त्याच्या कामात आता व्यत्यय नको होता. त्याने शांतपणे सोम्सना सांगितले. ''तुम्ही आपली सरळ पोलिसांची मदत घ्या बरं !''

पण सोम्स ऐकायला तयार नव्हते. त्यांच्या मते होम्सची मदत मिळाली नाही तर? तर मग त्यांचीच काय पण त्यांच्या कॉलेजचीही प्रतिष्ठा शिल्लक राहणार नव्हती. पण खरे तर शेरलॉक होम्स कोणत्याही गुन्ह्यांचे रहस्य उलगडण्याच्या मन:स्थितीतच नव्हता. त्यामुळे त्याचा निर्धार कायम होता.

पण सोम्स ऐकायला तयार नव्हता. त्याने आपले घोडे तसेच पुढे दामटायला सुरुवात केली. त्याच्या सांगण्यावरून हे प्रकरण वरवर अगदीच साधे वाटत होते. सोम्सच्या कॉलेजात दुसऱ्या दिवशी स्कॉलरशिपची परीक्षा होती. प्राध्यापक महाशयांनी ग्रीक भाषेची प्रश्नपत्रिका काढली होती. या प्रश्नपत्रिकेत भाषांतराचा एक प्रश्न होता. त्यासाठी त्यांनी एक भला मोठ्ठा उतारा निवडला होता. अर्थात जोपर्यंत तो उतारा माहीत नाही, तोपर्यंत तो अवघड होता आणि एकदा माहीत झाला तर ? तर पैकीच्या पैकी गुण मिळणं काही अवघड नव्हतं आणि अगदी तसंच घडलं होतं. हे प्राध्यापक महाशय हा उतारा आपल्या टेबलावर तसाच ठेवून मित्रांकडे चहा प्यायला म्हणून जेमतेम तासभर बाहेर जाऊन आले. आल्यावर पाहतात तो काय ? दरवाज्याच्या कुलूपात किल्ली तशीच. आपल्या विसरभोळेपणाला शिव्या देत त्यांनी सहज खिशात हात घातला तर किल्ली त्यांच्याच खिशात होती. आता मात्र मि. सोम्सना धक्काच बसला. त्यांनी नीट निरखून पाहिले मात्र त्यांच्या लक्षात सारे काही आले. ''अरेच्या! ही किल्ली तर बॅनिस्टरची आहे. ''बॅनिस्टर म्हणजे प्राध्यापकांचा नोकर.'' हां मग शक्य आहे. बॅनिस्टरच मला चहा विचारायला खोलीत आला असणार आणि जाताना किल्ली तशीच ठेऊन गेला असणार.'' असे म्हणत प्राध्यापक महाशय खोलीत शिरले मात्र; फक्त बेशुद्धच पडायचे शिल्लक राहिले. खोलीत प्रश्नपत्रिकेचे एक पान जमिनीवर पडले होते. तर दुसरे खिडकीत आणि तिसरे टेबलावर पडले होते.

आता शेरलॉक होम्सला प्राध्यापक महाशयांच्या बोलण्यात रस वाटू लागला होता. त्याने त्यांना त्यांचे बोलणे चालू ठेवायला सांगितले होते.

या साऱ्या सांगण्यातून लक्षात आले की बॅनिस्टरने काही त्या कागदपत्रांना हात लावलेला नव्हता. कदाचित असेही असेल की एखादा विद्यार्थी सरांच्या खोलीसमोरून बाहेर गेलेले पाहून त्याला मोह झाला

नसता तरच नवल होते. कारण त्या प्रश्नपत्रिकेवर दुसऱ्या दिवशीच्या स्कॉलरशिपचे सारे भवितव्य अवलंबून होते.

प्रा. सोम्सनी बॅनिस्टरला याविषयी विचारायला सुरुवात केल्यावर बॅनिस्टरला हे सारे ऐकून धक्काच बसला आणि तो मटकन खुर्चीत बसला. नंतर बॅनिस्टरला ब्रँडी देऊन तो ताजातवाना होईपर्यंत प्राध्यापकांनी जेव्हा खोलीची पाहणी केली तेव्हा त्यांना त्या चोराने मागे सोडलेल्या अनेक खुणा दिसल्या. खिडकीजवळ ठेवलेल्या टेबलावर पेन्सिलीला टोक केल्यावर उरणारे लाकडाचे अनेक छिलके दिसत होते. त्यांच्या टेबलावरही चाकूने उठावा तसा एक मोठा ओरखडा दिसत होता. ''घाईघाईत प्रश्नपत्रिका उतरवून घेताना त्याच्या पेन्सिलीचे टोक तुटलेले दिसते आहे.'' असे पुटपुटत प्राध्यापक महाशयांनी खोलीत नजर टाकली तर तेथे त्यांना वाळलेल्या चिखलाचे अनेक छोटे छोटे गोळे पडलेले दिसले. त्या चिखलाच्या गोळ्यांत थोडा थोडा भुस्सा सुद्धा दिसत होता.

हे सारे पाहून प्रा. सोम्स धावतच होम्सकडे आले होते. आता गुन्हेगाराला पकडणे आवश्यकच होते. कारण परीक्षा पुढे ढकलणे म्हणजे कॉलेजची अब्रू चव्हाट्यावर टांगण्यासारखे होते.

शेरलॉक होम्सने सारी हकिकत ऐकली आणि ओव्हरकोट खांद्यावर टाकत तो शांतपणे उठला. ''माझ्या परीने तुम्हाला जास्तीत जास्त मदत करायला आवडेल, प्राध्यापक महाशय.''

होम्सने प्राध्यापकांना विचारलेल्या प्रश्नांवरून नंतर एवढेच ध्यानात आले की प्रश्नपत्रिकांची प्रुफे छापखान्यातून आल्यापासून दौलतराम नावाचा एक भारतीय विद्यार्थी फक्त प्रा. सोम्सकडे येऊन गेला होता; पण टेबलावर प्रश्नपत्रिका आहेत हे त्याला कळण्याची फारशी शक्यता नव्हती.

शेरलॉक होम्स मला म्हणाला. 'चल वॉटसन, आपण जरा प्राध्यापक महाशयांच्या खोलीवर जाऊन येऊ.'

प्राध्यापक सोम्स वसतिगृहाच्या तळमजल्यावर राहात होते. वरच्या प्रत्येक मजल्यावर एक विद्यार्थी राहात होता. खोलीचे बाहेरून निरीक्षण केल्यावर शेरलॉक होम्सच्या लक्षात आले की दरवाज्याशिवाय इतर कोठूनही खोलीत प्रवेश करणे शक्य नव्हते. बराच वेळ शेरलॉक होम्स त्या खोलीच्या खिडकीचे निरीक्षण करीत होता. खोलीत प्रवेश केल्यावर शेरलॉक होम्सच्या लक्षात खोलीची रचना आली. चक्कर आल्यामुळे खुर्चीत बसलेला बॅनिस्टर आता ते नव्हता पण ती खुर्ची मात्र खिडकीशेजारी तशीच होती. गालिच्याचे निरीक्षण संपवून शेरलॉक होम्सने टेबलाचे निरीक्षण सुरू केले. त्याच्या लक्षात आले की १५ मिनिटे त्या गुन्हेगाराला कॉपी करण्यासाठी लागली असावीत. तेवढ्या त्याच्या पेन्सिलीचे टोक तुटले म्हणून त्याने पेन्सिलीला टोक केले. शेरलॉक मला म्हणाला, ''वॉटसन, ही पेन्सिल मऊ शिसे असलेली निळ्या रंगाची असली पाहिजे. त्या पेन्सिलीवर चंदेरी रंगात कंपनीचे नाव लिहिलेले असावे. ज्या तुकड्याने लिहिलेले आहे तो तुकडा जेमतेम दीड इंचच शिल्लक राहिलेला असावा आणि आणखी सांगायचं झालं तर त्या चोराकडे लांब आणि बोथट सुरी असावी.''

हे सारे ऐकून प्रा. सोम्सचे डोळे विस्फारले. पण होम्सने खुलासा केला की Johann Feber या प्रसिद्ध कंपनीची ती पेन्सिल असणार. अर्थात त्याच्या हातातल्या पेन्सिलीच्या छिलक्यावरची चंदेरी अक्षरे nn अशी सहज दिसत होती.

आता पेन्सिलीकडून होम्स त्या मातीच्या छोट्या गोळ्यांकडे वळला होता. खरोखरच त्या गोळ्यांमध्ये लाकडाचा भुसा दिसत होताच आणि टेबलावर एक लांबलचक ओरखडाही होता.

खोलीच्या दुसऱ्या टोकाकडे एक दरवाजा होता. हा दरवाजा झोपण्याच्या खोलीत उघडत होता. होम्स आत शिरला आणि त्याला जणू अपेक्षित

असल्यासारखे तेथेही ते चिखलाचे गोळे आढळले. अर्थात प्रा. सोम्सचा आवाज ऐकून तो चोर लेकाचा बेडरूममध्ये पळाला असणार.

''म्हणजे मी जेव्हा खोलीची तपासरी करत होतो तेव्हा तो गुन्हेगार माझ्या बेडरूम मध्येच होता तर!'' प्रा. सोम्स पश्चातापाच्या स्वरात बोलले.

शेरलॉक होम्सने आता आपले लक्ष त्या विद्यार्थ्यांकडे वळवले. प्रा. सोम्सकडून कळलेल्या माहितीनुसार वरच्या मजल्यावर गिलख्रिस्ट राहात होता. तो अतिशय हुशार होता. कॉलेजकडून तो रग्बी आणि क्रिकेटही खेळत असे. लांब उडी आणि अडथळ्याच्या शर्यतीतही त्याने कॉलेजकडून भाग घेतला होता, पण वडिलांचे दिवाळे निघाल्यामुळे आज त्याची परिस्थिती फारशी चांगली नव्हती. त्यावरच्या मजल्यावर दौलतराम राहात होता. सर्वच भारतीय विद्यार्थ्यांप्रमाणे तो कष्टाळू होता. त्याचा ग्रीक विषय जरी कच्चा असला तरी मेहनती असल्यामुळे तसा प्रश्न नव्हता.

सगळ्यात वर माईल्स मॅकलर्न राहात होता. हा अतिशय बुद्धिमान होता पण तितकाच लहरीही होता. गेल्याच वर्षी खरेतर त्याला कॉलेजमधून काढून टाकले असते.

खरे तर तिघांपैकी कोणावर संशय घ्यावा हे प्रा. सोम्सना कळत नव्हते.

शेरलॉक होम्सने बॅनिस्टरला बोलावून घेतले व त्याची उलटतपासणी सुरू केली. बॅनिस्टरच्या हातूनच किल्ली कुलूपाला तशीच राहिली होती. यात शंकाच उरली नाही. त्यामुळे हे सारे घडल्याने त्याला खूप धक्का बसल्याचे तो पुन्हा पुन्हा सांगत होता. चक्कर आल्याआल्या तो खुर्चीतच मटकन का बसला आणि नंतर काय घडले हे त्याला काही काही म्हणून आठवत नव्हते. प्रा. सोम्स शेरलॉक होम्सकडे आल्यावर थोड्या वेळानंतर सावरल्यावर तो खोलीला कुलूप लावून आपल्या घरी गेला होता.

होम्सने मला बरोबर घेतले आणि आम्ही बाहेर आलो. एकेका विद्यार्थ्याकडे जाण्याचा त्याचा बेत होता. पहिल्या खोलीचे दार ठोठावले आणि गिलख्रिस्टने दार उघडले. तरतरीत, उंच अशा गिलख्रिस्टच्या खोलीत जुन्या वास्तुशिल्पाचे सुंदर नमुने होते. ते नमुने कागदावर रेखाटण्याच्या निमित्ताने होम्सने पेन्सिल काढली पण तिचे टोक मोडले. त्याने गिलख्रिस्टकडून पेन्सिल मागितली व एक चाकूसुद्धा मागितला.

दुसऱ्या खोलीतही हाच प्रकार घडला. मॅकलर्नच्या खोलीत मात्र वेगळे घडले. शेरलॉकने दार वाजवल्यावर आतून उद्धट शिव्यांचा भडीमार झाला व दार उघडण्यास ठाम नकार मिळाला. प्रा. सोम्सच्या मते बऱ्याचदा हा विद्यार्थी असेच वागे. जाताजाता प्राध्यापकांनी मॅकलर्नची उंची गिलख्रिस्टपेक्षा कमी पण दौलतराम पेक्षा जास्त असल्याची माहितीही पुरवली.

आम्ही तिघे परत आलो तरी तो भारतीय विद्यार्थी अजूनही त्याच्या खोलीत अस्वस्थपणे येरझाऱ्या घालत होता. मी मात्र मॅकलर्नच्या उद्धट वागण्याने अस्वस्थ झालो होतो. चालता चालता होम्स म्हणाला. ''मला त्या बॅनिस्टरचा फारच संशय येतो आहे. त्याचे वागणे जरा विचित्रच होते नाही?''

थोड्याच वेळात होम्स उठला व प्राध्यापक महाशयांना म्हणाला, ''सर तुम्ही आता झोपा उद्या बघू या काय ते.''

(क्रमशः)

(शेरलॉक होम्सने हा प्रश्न कसा सोडवला असेल? खरा गुन्हेगार कोण? विचार करा. या प्रश्नाचे उत्तर त्याच्या सविस्तर कारणांसह आमच्याकडे पाठवा. तुमची उत्तरे आम्ही प्रसिद्ध करू. शेरलॉक होम्सने ही समस्या कशी सोडवली ते पुढील अंकात.)

(सर ऑर्थ कॉनन डायल यांच्या
जगप्रसिद्ध कथेचा स्वैर अनुवाद)

# प्रश्नकौशल्यांचा वापर



## दीर्घोत्तरी व अन्य प्रकारचे प्रश्न – डॉ. नलिनी गुजराथी

**दीर्घोत्तरी प्रश्न** हे नावाप्रमाणेच दीर्घ किंवा मोठ्या उत्तराची अपेक्षा असलेले आहेत. साधारणपणे या प्रश्नांची उत्तरे लिहिणं म्हणजे एखादा निबंध किंवा लेख. टिपण तयार करण्यासारखेच आहे. भाषाशास्त्रे, समाजशास्त्रे इ. विविध विषयांमध्ये विचारले जाणारे दीर्घोत्तरी प्रश्न साधारणपणे पुढील प्रकारचे असतात.

**भाषा :** १) दिलेल्या विषयावर निबंध लिहा. २) औपचारिक किंवा अनौपचारिक पत्रलेखन ३) कवितेचे रसग्रहण ४) कथालेखन

**इतिहास :** १) पुढील व्यक्तींविषयी दिलेल्या मुद्यांनुसार माहिती लिहा. अ) मॅझिनी ब) गॅरिबाल्डी मुद्दे : विचारपद्धती, एकीकरण चळवळीतील कार्य

२) औद्योगिक क्रांतीचे परिणाम सांगा.

३) लोकमान्य टिळकांना असंतोषाचे जनक का म्हटले आहे?

**शास्त्रे :** विज्ञान आणि रसायनशास्त्रामध्ये तुलनेने दीर्घोत्तरी प्रश्न कमी विचारले जातात. त्यामानाने जीवशास्त्रामध्ये दीर्घोत्तरी प्रश्न खूप विचारले जातात. उदा: १) मधमाशीच्या सामाजिक जीवनाचे वर्णन करा. २) पेशी विभाजनात खालील अवस्थेत पेशीत कोणते बदल होतात. अ) पूर्वावस्था ब) मध्यावस्था क) पश्चावस्था ड) अंत्यावस्था

३) सरल उतींचे प्रकार सांगा. त्या प्रत्येकाचे कार्य लिहा.

४) निसर्गातील नायट्रोजनचे चक्र कसे चालते ते आकृतीसह वर्णन करा.

यासारखे प्रश्न जीवशास्त्रामध्ये जवळ जवळ प्रत्येक धड्यात विचारलेले असतात.

सामाजिक शास्त्रे व शास्त्रे यामध्ये दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहिताना विषयांशी संबंधित सर्व मुद्दे आले आहेत की नाहीत एवढे पाहिले की काम होते परंतु भाषेतील दीर्घोत्तरी प्रश्नांच्या उत्तरांमध्ये आशयाबरोबरच चांगली वर्णनशैली, चपखल शब्दरचना, अलंकारांचा वापर इ. गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे लागते. तुमच्या लेखनशैलीनुसार त्या उत्तराला मिळालेले गुण बदलू शकतात. उदा: निबंध, कथा, पत्र इ.

या प्रश्नांची स्वतंत्रपणे खूप तयारी करायला हवी. निबंध हा एकदा लिहून पुरत नाही. त्यातील शब्दरचना, सुरुवात, शेवट, बाहेरील काव्यपंक्ती, सुभाषिते, सुविचार यांचा वापर या सर्व बाबतीत सुधारणा करून २-३ वेळा तरी निबंध लिहिला पाहिजे. शिक्षकांकडून, तज्ज्ञांकडून तपासून घेतला पाहिजे. तरच त्यात मिळालेले गुण वाढू शकतील. यासाठी वर्षभर अन्य पुस्तकांचे खूप वाचन करावे लागते. अवतरणांचा संग्रह करावा लागतो. भाषेतील या प्रश्नांची तयारी कशी करावी हा स्वतंत्र लेखाचाच विषय होईल.

या लेखात जे लघुत्तरी व दीर्घोत्तरी प्रश्नांचे नमुने दिले आहेत त्या नमुन्याचे प्रश्न प्रत्येक विषयातील पाठावर स्वत: काढण्याचा प्रयत्न करा. कशा प्रकारचा प्रश्न विचारला जाऊ शकेल याचा तुम्हाला जर आवाका आला तर अभ्यासातील अर्धी लढाई आपण जिंकली आहे असे समजण्यास हरकत नाही.

प्रश्नांचे वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, दीर्घोत्तरी प्रश्न असे प्रकार आपण पाहिले. प्रश्नाच्या उत्तराच्या व्याप्तीवरून हे प्रकार पडलेले आहेत. यापेक्षा वेगळ्याप्रकारे प्रश्नांचे वर्गीकरण आपल्याला

करता येईल. जसे माहितीवजा प्रश्न, तर्काधिष्ठित प्रश्न, मूल्यमापनात्मक प्रश्न, रसग्रहणात्मक प्रश्न, सृजनशील प्रश्न

ज्या प्रश्नांच्या उत्तरांमधून आपणाला एखाद्या विषयाची माहिती मिळते त्या प्रश्नांना **माहितीवजा प्रश्न** किंवा **आकलनात्मक प्रश्न** असेही म्हणता येईल, परीक्षेमध्ये विचारले जाणारे बहुतांशी प्रश्न हे माहितीवजा/आकलनात्मक स्वरूपाचे असतात.

उदा :- १) पूर्वीच्या काळी चित्रकार चित्रे कधी काढीत? २) आपली जुनी चित्रे कोणत्या रंगातील असत? ३) पूर्वीच्या चित्रांसाठी वापरण्यात येणारे रंग कशापासून तयार करीत असत?

या प्रश्नांच्या उत्तरांमधून पूर्वीच्या काळच्या भारतीय चित्रकलेची माहिती आपल्याला मिळते. साधारणपणे असे प्रश्न 'कोण', 'काय', 'कोणते', 'कसे', 'कुठे', 'किती', 'केव्हा', 'कधी' या प्रकारचे शब्दप्रयोग वापरून रचलेले असतात.

जे प्रश्न आपल्या बुद्धीला तर्क करायला लावतात. विचार करायला लावतात त्यांना **तर्काधिष्ठित प्रश्न** म्हणता येईल. असे प्रश्न आपल्याला निरीक्षणामधून सुचू शकतात. झाडावरून फळ खाली पडताना पाहून न्यूटनला प्रश्न पडला होता की फळ खाली जमिनीवरच का पडते? त्या प्रश्नाचे कारण शोधण्याचा त्याने प्रयत्न केला व त्याला गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत सापडला. अशी आणखी काही उदाहरणे देता येतील.

१) इंद्रधनुष्य सप्तरंगी का दिसते?

२) कुंडीतील रोपटे अचानक मेलेले दिसले, कशामुळे ते मेलेले असेल?

३) पृथ्वीचे तपमान वाढून जर पृथ्वीवरील सगळा बर्फ वितळला तर काय काय परिणाम होतील?

याप्रमाणे तर्काधिष्ठित प्रश्नांमध्ये एखाद्या गोष्टीमागील कारण शोधणं, एखाद्या गोष्टीच्या परिणामांचा विचार करणं, एखाद्या गोष्टीमधील कार्यकारण संबंध लक्षात येणं या प्रक्रिया समाविष्ट आहेत. तर्काधिष्ठित प्रश्न हे बुद्धीला चालना देणारे, विचार करायला लावणारे असतात व असे प्रश्न तुम्हाला काढता येणं खूप आवश्यक आहे, महत्त्वाचे आहे. साधारणपणे या प्रश्नांमध्ये 'कोणते' (कोणते कारण, कोणते परिणाम) हा शब्दप्रयोग वापरला जातो. भाषेमध्येसुद्धा तर्काधिष्ठित प्रश्न विचारता येतात. उदा. : खालील उतारा पहा.

'एक पत्र'

''सध्या तुमचे फार फार नुकसान झाले आहे. तुम्ही सध्या लहान असून तुमचे अजून पुष्कळ शिक्षण होणे आहे. अशावेळी लहान भावाचा व आईचा सांभाळ करण्याचे दुष्कर काम तुमचेवर काही दिवस तरी परमेश्वराने टाकावयाचे नव्हते. असो. ईश्वरेच्छेपुढे कोणाचा उपाय आहे? दुःखावेगाने खचून जाऊन आपले नुकसान करून घेऊ नये. तुला आधार आईचा व आईला तुझा व तुम्हा दोघींचा आधार त्या बिचाऱ्या शंकरला !

प्रश्न : १) कोणती घटना हे पत्र लिहिण्यास कारणीभूत झाली असावी असे तुम्हाला वाटते? २) शंकर ही व्यक्ती कोण असावी? साधारणपणे काय वयाची असावी? ३) 'दुःखावेगाने खचून जाऊन आपले नुकसान करून घेऊ नये, हे नुकसान कोणते असावे?

वरील सर्व प्रश्न हे तर्काधिष्ठित प्रश्न आहेत. मूल्यमापनात्मक प्रश्न हे आणखी थोड्या वरच्या स्तरावरचे प्रश्न झाले. या प्रश्नांच्या आधारे आपल्याला एखाद्या गोष्टीचे मूल्यमापन करायचे असते. त्यातील विविध घटकांची तुलना करायची

*(पान क्रमांक २३ वर पुढे चालू)*

# चला π ची किंमत काढू या.

गणितात काही थोड्या संख्या अशा आहेत की ज्या वारंवार वापरल्या जातात. π ही अशीच एक संख्या. π म्हणजे वर्तुळाचा परीघ व व्यास यांचे गुणोत्तर हे आपल्याला माहीत आहे. π ही अपरिमेय संख्या (Irrational Number) आहे. हेही तुम्ही वाचले असेल. म्हणजेच π ही संख्या p/q अशी दोन पूर्णांक संख्यांच्या गुणोत्तराच्या स्वरूपात लिहिता येत नाही. म्हणजेच π ची किंमत आपण दशांश अपूर्णांकाच्या स्वरूपात लिहिण्याचा प्रयत्न केल्यास ३.१४१५ ...... अशी संख्या येते. या संख्येत दशांश चिन्हानंतर येणारे अंक संपत तर नाहीतच पण कोणताही अंकगट आवर्ती म्हणजे पुन्हा पुन्हा येणार नाही. गणितज्ञांनी आधुनिक संगणकाच्या मदतीने काही लक्ष दशांश स्थळांपर्यंत π ची किंमत काढून पाहिली आहे. त्यामध्येसुद्धा अंकांचा एकही आवर्ती गट त्यांना आढळून आलेला नाही. अर्थात उदाहरणे सोडवताना आपल्याला π ची अंदाजे किंमत घ्यावी लागते. आपण ती २२/७ किंवा ३.१४२ अशी घेतो.

बऱ्याचदा आपला असा समज असतो की ही संख्या फक्त भूमितीतच येते पण प्रत्यक्षात मात्र गणिताच्या प्रत्येक शाखेत π चा काहीना काहीतरी उपयोग असतो. π म्हणजे वर्तुळाशी संबंधित संख्या हे आपल्याही डोक्यात पक्के बसलेले असते. ते काढून टाकण्यासाठी आपण π ची किंमत काढण्यासाठी एक प्रयोग करून पाहू.

एका कोऱ्या कागदावर ठराविक अंतरावर (समजा (k cm) एकमेकींना अनेक समांतर रेषा काढा. आता दोन रेषांमधील अंतरापेक्षा जिची लांबी कमी आहे अशी एक काडी घ्या. (समजा t cm) कागदापासून ठराविक उंचीवरून ती काडी कागदावर टाका. जितक्या वेळा काडी टाकाल ती संख्या नोंदवून ठेवा. (समजा ती संख्या n आहे.) आता जितक्या वेळा ती काडी कागदावरच्या कोणत्याही एका रेघेला छेदत असेल ती संख्या नोंदवून ठेवा. (समजा ती संख्या m आहे.) आता जितक्या वेळा ती काडी कागदावरच्या कोणत्याही एका रेघेला छेदत असेल ती संख्या नोंदवून ठेवा. (समजा ती संख्या m आहे.) तर m/n या संख्येला काडीने कोणत्याही एका रेषेला छेदण्याची संभवनीयता म्हणतात व ती p या अक्षराने दाखवतात. p काढण्यासाठी पुढील सूत्र वापरतात. p = m/n व m/n = 2t/kπ म्हणजेच π = (2g/m) × (n/m) अर्थात π ची किंमत जास्तीतजास्त दशांश स्थळांपर्यंत अचूक येण्यासाठी हा प्रयोग तुम्हाला अनेकवेळा करावा लागेल. जर एक हजारवेळा तुम्ही हा प्रयोग केलात तर कदाचित π = ३.१४ अशी π ची किंमत तुम्हाला मिळू शकेल. आता तुमच्या मनात π म्हणजे फक्त भूमिती असे समीकरण उरण्याचे कारण नाही. बघा बघू प्रयत्न करून. जास्तीत जास्त वेळा हा प्रयोग करून π ची किंमत काढा आणि आमच्याकडे पाठवा.

✿ ✿

## असे का?

तुम्ही बसमधून अनेकदा प्रवास करीत असाल. खिडकीशेजारी जागा मिळाली तर आपल्याला आनंद होतो. बाहेरचे बघायला मिळते हे तर खरेच पण छान गार वारा लागतो हेही त्यामागचे कारण असते. बसच्या प्रत्येक खिडकीशेजारी बसलेल्याला वारा लागतो म्हणजे इतकी हवा बसमध्ये येते मग आतली हवा कोठून तरी बाहेर जायला हवी तरच हवेचा आतील व बाहेरचा दाब सारखा होईल. मग सांगा बघू ही हवा कोठून बाहेर जाते?

# प्रगतगावचा गणपती

– श्री. सुभाष देशपांडे

पोरं म्हणाली सगळी गावातली म्हणून गोविंदानं यंदा गावचा गणपती बसविण्याचा चंग बांधला. 'दरवेळी शेजारच्या वडगावला का आरतीला जायचं आता आपली बी ग्रामपंचायत वेगळी केलीय न्हवं सरकारनं मंग आपला शेपरेट गन्पती हवा' असं पांडूचं म्हणणं होतं.

छोट्या वाडीला आता 'प्रगतगाव' असं वेगळं नाव नोंदवून आलेलं होतं. आमचा कारभार आम्ही चालवू. दुसऱ्याच्या बोंडलानं दूध प्यायला आता दुधखुळे राहिलेलो नाही असं ज्याला त्याला वाटत होतं. पण हे बोलायचं कसं असा प्रश्न होता. 'वेगळा' गणपती हे त्याच्यावरचं नामी उत्तर सापडल्यानं गावातला प्रत्येकजण हरखला होता.

उगीच लहान सहान 'मूर्त' आणायची नाही. मिरवणुकीत आपण सगळ्या खोऱ्यात उठून दिसलं पाहिजे अशी अटकळ नव्या पंचायत सदस्यांनी बांधली. तरूण मंडळानं पुढाकार घेतला पाह्यजे, अशी 'बैठक' बसली होती तेव्हा चर्चा झाली होती. शिकली सवरली बरीचशी पोरं शहराकडं होती. ह्यामुळं त्यातल्या त्यात नव्यानं ग्रॅज्युएट झालेला गोविंदा गावच्या तरूण मंडळाचा आपोआप म्होरक्या झाला. ''ब्यांकत चिकटायचं सोडून हे प्वारगं औत धरायचं म्हन्तेय कुठून अवदसा आठवली पोराला'' असं त्याचा बाप घरबसल्याच कुथत होता.

चतुर्थी जवळ आली तसे बाकीचे विषय मागे पडले. वर्गणी गोळा करायला पोरांचं एक टोळकं बाहेर पडलं. यंदा पहिलंच वर्ष म्हणून भरघोस वर्गणी हवी असे म्हणताना प्रत्येकाला आपल्या घरचंच कार्य आहे इतका आनंद होत होता.

गणपती बसवायची जागा ठरली; पण देखाव्यावर लवकर एकमत होईना. तालुक्याकडची थर्माकोलची महिरप आयती स्वस्तात मिळतीय ती घेऊ असं काहींचं म्हणणं होतं; तर काहींना दुसऱ्याचा गेल्या वर्षीचा देखावा असा आणणं कमीपणाचं वाटत होतं. आपला देखावा असा आणणं कमीपणाचं वाटत होतं. आपला आपणच स्वस्तात करू. काम पण मस्त दिसलं पाहिजे. गोविंदानं निर्णायक मत दिलं आणि कलाकारांच्या रात्री जागू लागल्या.

दोन तरी बाहेरचे कार्यक्रम हवेत असं तरूण मंडळींच्या बैठकीत ठरलं. करमणूक हवी यावर सगळ्यांचं एकमत होतं; पण गावाला दोनच प्रकार यापूर्वीचे ठाऊक होते. एकतर बाहेरगावचं भजनी मंडळ किंवा दुसरा म्हणजे उरसातला तमाशाचा फड. 'गणपतीला वेगळं काय करू या' गोविंदानं प्रस्ताव मांडला.

''पिक्चर दाखवा फर्स्टक्लासपैकी'' एकजण



उत्स्फूर्तपणे म्हणाला.

"आता रोजचे टी.व्ही.वरचे कमी पडताहेत पिक्चर म्हणून आणखी हवा का तुला?" त्याच्यावर दुसरा डाफरला.

"हे बघ आजकाल कार्यक्रमाची भानगड शहरात तरी कुठं उरलीयं. गायकवाड वाडा आणि मोजकी २-४ ठिकाणं सोडली तर भाषणं ऐकायला येतो तरी कोण? आपली दिव्यांची उघडझाप करणारी मस्त आरास करायची आणि बाकी शेवटी मिरवणुकीत हैदोस धुल्ला घालायचा एवढ्यावर आलेत सगळे जण." 'पांडूचा पाव्हणा' माहीतगाराच्या स्वरात उद्गारला.

"शहराचं जाऊ द्या हो. आपल्या गावात वेगळ्या प्रकारचे कार्यक्रम करू या की." गोविंदा उमेदीनं म्हणाला.

"ते तुपलं तू बघ. कुणाला आणायचं आणि लोकं जमवायची हे आम्हाला नाही जमायचं. आमच्याकडं शेवटच्या पूजेचं काम द्या. तीर्थप्रसादाचं बाकीच तूच कर रे बाबा" तरूण मंडळातला एक कार्यकर्ता बिचकला.

"ते ठीक आहे माझे दोस्त बघतो जुने कॉलेजातले इथं येऊन काही करताहेत का कार्यक्रम ते" गोविंदानं काम पत्करलं.

चतुर्थीची पहिली पूजा चांगली पार पडली. दोन दिवसांनी संध्याकाळी एका टेम्पोमधून १०-१२ शहरी पोरं गावात उतरली. गोविंदाची चौकशी करत ती मारूतीच्या देवळात शिरली. इकडं गणपतीच्या मांडवाशेजारी लाऊडस्पीकर चालू झाला. "संध्याकाळी ७.३० वाजता 'कला विकास पथकाचे पथनाट्य होणार आहे हो" म्हणून आवाज घुमला.

सूचना देऊन पथनाट्य करण्याची कलाविकास पथकाची ही पहिलीच वेळ होती. एरवी शहरात एखाद्या चौकात संवाद घुमायला लागले की गर्दी आपोआप जमायची. गावच्या चौकात एक रिंगण त्यांनी धरलं. लोक गोळा व्हायला लागलेत हे पाहून त्यांच्या म्होरक्यानं आरोळी ठोकली.

'अरे गणपती गणपती देव बसला
त्याला एकमूठ मोदकाचा नैवेद दिला!'

ह्यावर दुसरा सरसावून म्हणाला.

'अरं एकमुठीची शक्ती दाबून
घालावलं त्या इंग्रजाला ऽऽ
आता कशाला उगारतो तू
ऐट दाखवित समद्याला?'

ह्यावर पथकातल्या उरलेल्यांनी एकत्र सुरात म्हटलं

'चिमूटभर की मीठ उचलुनी
केलं वादळ गांधीनं
अन्यायावर मूठ उगारू
घाव घालू या एकीनं !'

हे ऐकून पथकातल्या दोन मुली म्हणाल्या -

'फुकाचेच रे' 'बोल' सांगता
दिव्याखाली बघ अंधार
एकजूट देशाची होईल
गाव पाहता नाही खरं !'

यावर क्षणभर शांतता पसरली.

तोच गावातल्या एका मुलीनं आयत्या वेळी ओळी रचून खड्या आवाजात म्हटलं.

'नाही लागली संगत आम्हा
कळलाव्यांच्या दुफळीची
परगतगावी पूजा झाली.
एकमूठ गणरायाची!
एकमूठ गणरायची!!'

'वाहवा रे वाहवा!' गावकऱ्यांचा एकच आवाज घुमला.

**गणपती बाप्पा मोरया**

**प्रगतगावला जरूर या !** ✿ ✿

## निर्धार

निर्धार करायचा असतो तो का फक्त क्रांतिकारकांनी? नाजूक, साजूक कलिकासुद्धा निर्धार करत असते – फुल होण्याचा ! मग आपण बालकं का नाही करणार निर्धार ... खूप खूप मोठ्ठं होण्याचा !!

सोप्या भाषेतील चपखल शब्दांमधली कुसुमाग्रजांची ही अर्थपूर्ण कविता आपल्यालाही निर्धारानं फुलण्याची प्रेरणा देवो.

*साऱ्याच कळ्यांना जन्मसिद्ध*
*हक्क आहे फुलण्याचा*
*मातीमधली वतनवारसा*
*आकाशावर कोरण्याचा!*

*जन्म असो माळावरती*
*अथवा शाही उद्यानात*
*प्रत्येक कळीला हक्क आहे*
*फूल म्हणून जगण्याचा!*

*गुलाब असो कमळ असो*
*कळी असो गटारातील*
*तिच्यासाठी तिष्ठत असतो*
*एक किरण सूर्याचा!*

*प्रत्येक कळीत जागत असतो*
*निर्धार फूल होण्याचा*
*दिमाखाने दिसण्याचा अन्*
*सुगंधाने असण्याचा!*

*– कुसुमाग्रज*

## सुंदर आई – प्रेमळ आई

सुंदर आई, प्रेमळ आई, ही अमुची आई
देह मंदिरी चैतन्याची प्राण ज्योत आई।।
प्रसन्न, मंगल, प्रेमळ माता
मूर्तिमंत की करुणा ममता
दया, क्षमा, शांतीची पावन ही गंगामाई ।।१।।
माय पक्षिणी अम्ही तर पिल्ले
चारा पाणी हिने भरविले
जीवन गगनी विहरायला हीच पंख देई ।।२।।
दूध हिचे प्राशून पोसलो
कुशीत हिचिया रडलो हसलो
हिचा कृपामय झरा जागता झुळझुळतो देही।।३।।
हिने दिली आम्हाला वाणी
आणि शिकविली बोबड गाणी
रांगत चालत धडपडताना ही उचलून घेई।।४।।

**बसवराज सूर्यकांत बसरगी**
९ वी – पटवर्धन हायस्कूल, सांगली

## आमची बेबी

आमची बेबी कित्ती शहाणी
बोबड्या स्वरात गाते गाणी !
आमची बेबी कित्ती हुशार
एक ... दोन नंतर म्हणते चार !
आमची बेबी कित्ती खुळी
हसताना पडते गालावर खळी !
आमची बेबी धडपडी खूप
'नाक पूस' म्हणताच बसते चूप !

**रेशमा शेख, शुभा राठी**
७ वी – ज्ञानप्रबोधिनी, सोलापूर

# झुंजार विरांगना मादाम कामा

**– ले. शांता बुद्धीसागर, सोलापूर**



'ही भारतीय स्वातंत्र्याची पताका आहे. आपण सारे तिच्या जन्माचे साक्षी आहात. तरूण हुतात्म्यांच्या रक्ताने तिला आधीच अभिषेक झाला आहे. मी आपल्याला आवाहन करते की उठा ! उभे रहा आणि हिंदवी स्वराज्याच्या या ध्वजाला वंदन करा. या ध्वजाच्या वतीनं जगभरच्या स्वातंत्र्यभक्तांना मी विनंती करते की पृथ्वीतलावरील एक पंचमांश मानववंशाच्या बंधमुक्तीसाठी याला आपला दोस्तीचा हात द्या.' या अशा ओजस्वी शब्दांत २२ ऑगस्ट १९०७ रोजी जर्मनीतील स्टुटगार्ड शहरी दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेत एका हिंदी युवतीनं आपल्या भाषणाचं भरतवाक्य म्हणून आगावू कुणालाही कल्पना न देता मोठ्या नाट्यपूर्ण रितीने हातातील निशाणीची गुंडाळी उलगडली आणि जगाच्या विशाल व्यासपीठावर आपला ध्वज फडकवला. त्यांच्या या अभूतपूर्व कृतीने अवघं जनमानस थरारून गेले आणि टाळ्यांचा इतका प्रचंड कडकडाट झाला की तो थांबता थांबेना. विशेषत: हिंदुस्थानातही त्यावेळी अशी क्रांतिकारक भाषा बोलणाऱ्या स्त्रिया नव्हत्या. त्यामुळे मादाम कामाचं नाव – होय त्या तरूणीचं नाव होतं मादाम कामा – सर्वतोमुखी झालं.

सोराबजी पटेल नावाच्या अत्यंत धनाढ्य अशा व्यापाऱ्यांच्या घरात २४ सप्टेंबर १८६१ साली मादाम कामाचा जन्म झाला. तत्कालीन पारशी समाज ब्रिटिशधार्जिणा होता. एखाद्या अत्यंत श्रीमंत ब्रिटिश अधिकाऱ्याच्या घरात जेवढी आधुनिक सुखसाधने असावीत तेवढी सगळी या पटेल कुटुंबात होती. भिखाई (मादाम कामाचे लहानपणीचे नाव) दिसायला तर देखणी होतीच परंतु आधुनिक फ्रॉक परिधान करणारी, अस्खलीत इंग्रजीत संभाषण करणारी आणि पुरुषांच्या बरोबर बेधडक क्रिकेट खेळणारी भिखाई आधुनिक पारशी घरातील चर्चेचा विषय होऊन बसली होती परंतु तिचं वागणं नुसतं छानछोकीचं नव्हतं तर समाजातील, राष्ट्रातील घटना ती समजावून घेण्याचा प्रयत्न करी आणि घेता येईल त्या उपक्रमात स्वत:ला झोकून देऊन भाग घेई. १८९६ साली प्लेगने आपल्या देशात धुमाकूळ घातला होता. हा रोग संसर्गजन्य असल्यामुळे लोक रोगी लोकांचा संसर्ग टाळण्याचा प्रयत्न करीत परंतु भिखाईने मात्र न डगमगता पारशी पंचायतीच्या इस्पितळात नर्सिंगचंही काम केलं. फिरोजशाह मेहतानी बॉम्बे क्रॉनिकल हे राष्ट्रीय वृत्तपत्र सुरू करताच ती त्यांना सर्व प्रकारचे साहाय्य करण्यास उत्साहाने पुढे गेली. सोराबजींना वाटे अशा या धाडसी लेकीचं लग्न कसं होणार? सुदैवाने तो प्रश्न लवकरच सुटला.

प्रसिद्ध पंडित के.आर.कामा (ज्यांचे स्मारक मुंबईतील ओरिएंट इन्स्टिट्यूटमध्ये आहे) यांचा बॅरिस्टर होऊन परत आलेला रुस्तूम हा देखणा तरुण

भिखाईला सर्वतोपरी योग्य ठरावा असाच होता. कामा घराणेही गर्भश्रीमंत होते. विशेष म्हणजे त्यांच्या घरीही राष्ट्रीय वातावरणच होते. दादाभाई नवरोजींच्या 'रास्त गोपनार' या पत्राला कामा कुटुंबाचे भरघोस साहाय्य असे परंतु कामा कुटुंबाचा कल नेमस्तपणाकडे अधिक होता कामा कुटुंबातील सून म्हणून ती प्रारंभी काही दिवस सासरच्या उपक्रमात भाग घेई परंतु एकंदरीत तिचा ओढा जहाल क्रांतिकार्याकडे अधिक होता. घरात राहून सतत विरोधी विचार मांडण्यापेक्षा घर सोडून परदेशात जाणे तिने सरळ पसंत केले. १९०२ साली ती प्रथम विलायतेत गेली. काही दिवस लंडनमध्येच स्थायिक व्हायचं तिनं ठरवलं होतं. परंतु योगायोग असा होता की पुढची चौतीस वर्षे तिला परदेशातच रहावं लागणार होतं.

१९०६ साली दादाभाई नवरोजींना हाऊस ऑफ कॉमन्सची निवडणूक लढविली. त्यांच्या सहवासाने व मार्गदर्शनाने भिखाईच्या ठिकाणी मुळचीच असलेली स्वातंत्र्यज्योत जोमाने प्रफुल्लित झाली. हाइड पार्कच्या कोपऱ्यावर उभं राहून तिनं ब्रिटिश राजवटीविरूद्धचा संताप आणि हिंदी स्वातंत्र्यलढ्याबद्दलची माहिती तळमळीने व उच्चरवाने सांगण्यास सुरुवात केली. हे पाणी काही निराळंच आहे हे तेथील क्रांतिकारकांनी ताबडतोब ओळखले. सरदारसिंग राणा, श्यामजी कृष्णवर्मा, स्वातंत्र्यवीर सावरकर, मदनलाल धिंग्रा यांच्यासारख्या क्रांतिकारकांच्या सहवासात येणं ओघानंच आलं आणि मग तिनं खरोखरीच सतीचं वाण हाती घेतलं. अभिनव भारताचं काम करण्यासाठी ती पायाला भिंगरी लावून हिंडू लागली. स्फोटक लिहू, बोलू लागली. सावरकरांच्या १८५७ वरील ग्रंथाचा तिनेच फ्रेंचमध्ये अनुवाद केला. तिचा हा लौकिक लक्षात घेऊन तिला मजूर पुढारी श्री. हिंडमन यांनी सोशालिस्ट काँग्रेसला प्रतिनिधी म्हणून पाठवले. खुद्द लेनिनला भेटणारी ती पहिली भारतीय महिला असेल. १९०५ सालच्या रशियन बंडाळीचं तिनं मुक्तमनानं स्वागत केलं. मॅक्झिम गॉर्कीचा, तिचा तेथेच परिचय झाला. सावरकरांच्या ग्रंथाची प्रत तिनं गॉर्कीला आवर्जून दिली. एकदा क्रांतीचा मार्ग अवलंबिल्यानंतर त्यासाठी जे जे काही करणं आवश्यक होतं ते ते सर्व मादाम कामाने धैर्याने केलं. परिणामाची कोणतीही क्षिती बाळगण्याचा तिचा स्वभावच नव्हता. १९०९ च्या सप्टेंबरात तिने 'वंदेमातरम्' हे पत्र काढलं. तिच्या जळजळीत लेखनावर रूष्ट होऊन इंग्रज सरकारनं तिच्यावर हद्दपारीचा हुकूम बजावला परंतु त्यामुळे ती जराही घाबरली नाही उलट फ्रान्समध्ये गेल्यानंतर तेथे येणाऱ्या हिंदू तरुणांना ती नेमबाजीचे शिक्षण स्वत: देई. या मुलांना ती मातेच्या ममतेने वागवी. त्यांच्या खाण्यापिण्याची काळजी घेई. माहेरून तिला शुद्ध सोन्याचे दागिने मिळाले होते. ते एकेक करून तिने सर्व क्रांतिकार्यासाठी मोडले. सावरकर तर तिला कालीमाताच म्हणत व स्वत:ला तिचं लेकरू म्हणवून घेण्यात धन्यता मानीत. १९३६ साली मादाम कामा मायदेशी परत आली ती येथे प्राण ठेवण्याकरताच.

***

**हळूच हसा...**


## रस्त्यावरची पाटी

साऱ्या वाटसरूंना जाहीर करण्यात येते की इथून विठ्ठलवाडीला जो रस्ता जातो त्याच्या डाव्या बाजूला एक फार मोठा खड्डा आहे. म्हणून वाटसरूंनी उजव्या बाजूनंच जपून जावे म्हणजेच अपघात टळतील. जे कोणी निरक्षर असतील त्यांनी ही पाटी समोरच्या झाडापाशी बसलेल्या अंगठेबहाद्दर चांभाराकडे येणाऱ्या गिऱ्हाइकाकडून वाचून घ्यावी अशी विनंती आहे.

**सचिन बाळकुंडे,** ८ वी, लातूर

**स्थिती :** पाय ताठ करून नि एकमेकांना जुळवून ताठ बसा. हात ताठ करून जमिनीवर दाबा म्हणजे शरीर काटकोनात येईल व पाठ ताठ राहील.
१. उजवा पाय गुडघ्यात वाकवून मागे घ्या. तळपायावर उजवा कुल्ला ठेवून बसा.
२. डावा पाय असाच मागे न्या. मागच्या बाजूला दोन्ही पायांचे अंगठे एकमेकांना चिकटलेले (पायावर पाय चढवू नका.) पुढे गुडघे एकमेकांशी जुळेलेले. पाय ताठ. हात मांड्यांवर ठेवून, डोळे मिटून चित्त एकाग्र करा. (ह्या स्थितीला वज्रासन असे म्हणतात. काही काळ या स्थितीत बसा.)
३. आता गुडघ्यावर उभे राहा.
४. श्वास घेऊन मागे वाका. तळहात तळपायांवर टेकवा. मान ढिली सोडा. श्वसन चालू ठेवा. या स्थितीला उष्ट्रासन म्हणतात.
५. श्वास सोडत, अगदी सावकाश मूळ स्थितीत या.

**फायदे :** १. वज्रासनाच्या स्थिती प्रामुख्याने ध्यानासाठी अधिक उपयुक्त आहे. या आसनात पाठीचा कणा ताठ ठेवून आपण दीर्घकाळ बसू




शकतो. पायाची दुखणी (गुडघे नि घोटे दुखणं - शिरा फुगणं इ.) बरी होतात. भोजनानंतर लगेच हे आसन केल्यास अन्नपचनासाठी त्याचा उपयोग होतो.
२. उष्ट्रासनामुळे पाठीच्या कण्याला लवचिकता येते. पाठदुखीवर उपयोगी. डोक्याकडचा रक्तपुरवठा या आसनाने वाढतो.

✿ ✿

**करून तर पहा !....**

## कोऱ्या कागदावर आपोआप उमटणारा संदेश

मित्रांनो ! एक कोरा कागद घ्या. तो प्रेक्षकांना तपासण्यास द्या. तो कागद पूर्ण कोरा आहे याची खात्री करून घ्या. एवढे झाल्यानंतर ग्लासभर पाण्यात हा कागद बुडविण्यास सांगा. कागद बाहेर काढल्याबरोबर त्या कागदावर अक्षरे उमटलेली दिसतील हे पाहून प्रेक्षक थक्क होतीलच शिवाय तुम्हालाही वाहवा मिळेल.

गुपित - या प्रयोगांचे गुपित फारच सोपे आहे. प्रयोगापूर्वी दोन, चार कागदांवर एखादा संदेश अथवा सुविचार कपड्याच्या साबणाने लिहावा तेव्हा ही अक्षरे मुळीच दिसत नाहीत. ज्यावेळी कागद ग्लासमध्ये भिजेल तेव्हा ही अक्षरे स्पष्टपणे दिसतील. (या मागचे कारण शोधण्याचा प्रयत्न करा.)

**प्रेषक : एन. ए. टोमके (जादूगर)** पालक, ज्ञान प्रबोधिनी विद्यालय, निगडी

## प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास – मुक्काम दुसरा

### शब्दाला जुळवा शब्द

– डॉ. अशोक निरफराके

*एक होता **अशोक** ! तो करायचा सारखे **जोक** !*
*म्हणून चिडले **लोक** ! त्यांनी दिला त्याला **ठोक** !*

कशा काय वाटतात या ओळी? अशोकला चिडवण्यासाठी रचल्यासारख्या वाटतात ना? अशी चिडवाचिडवीची गाणी जुळवायला तुम्हालाही आवडेल आणि ते सहज जमूही शकेल. कसे करता येईल पाहा.

वरच्या चार ओळींमध्ये ओळीच्या शेवटी आलेल्या शब्दांकडे लक्ष द्या. 'अशोक' या शब्दांच्या उच्चारासारखाच उच्चार असलेले 'जोक' 'लोक' आणि 'ठोक' असे ते शब्द आहेत. अशा प्रकारच्या शब्दांना 'यमक' साधणारे शब्द असे म्हणतात. असे शब्द सुचणे हा देखील शब्दप्रभुत्वाचाच भाग आहे पण या वेळी आपण शब्दप्रभुत्वाकडून रचनाप्रभुत्वाकडे वळणार आहोत.

रचनाप्रभुत्व म्हणजे सुचलेल्या शब्दांची अर्थपूर्ण गुंफण करता येणे. वरच्या उदाहरणात 'जोक' 'लोक' आणि 'ठोक' हे तीनही शब्द छोट्या वाक्यांमध्ये गुंफले आहेत आणि त्या चारही वाक्यांमधून सलग अर्थ निघतो आहे.

तुम्हाला ज्या मित्राला/मैत्रिणीला चिडवावेसे वाटत असेल त्याच्या / तिच्या नावाशी किंवा आडनावाशी यमक साधणाऱ्या शब्दांची प्रथम यादी करा. मग प्रत्येक शब्द वापरून एकेक वाक्य तयार करा. यादीतले शब्द वाक्यांच्या शेवटी आले तरीही वाक्य बिघडता कामा नये. मग या वाक्यांच्या गुंफणीतून काही सलग अर्थ सांगायचा प्रयत्न करा. हा अर्थ गंमतीदार असला तर जास्त मजा येईल. अशा चिडवाचिडवीच्या छोट्या गाण्याला एक दोन शब्द सुचले तरी चालते. कारण पुढच्या ओळींसाठी वेगळे यमकही जुळवता येते. उदाहरणार्थ :

*एक होती **केतकी** ! तिला भेटली **चेटकी** !*
*चेटकी म्हणाली **हुप** ! केतकी म्हणाली **चूप** !*

आता तुम्हीही अशी गाणी रचा आणि आमच्याकडे पाठवा.

***

**प्रतिसाद पहिल्या मुक्कामाचा**

१. खंडूने खोडदच्या खंडोबाजवळचे खारीक खोबरे खारीच्या खुबीने खाल्ले.

– पराग जोशी, ८ वी, धुळे

२. गाणगापूरच्या गलेलठ्ठ गणू गवळ्याने गोड गुलाबजाम गिळून गंगाखेडच्या गणपतरावांच्या गुबगुबीत गादीवरून गावकऱ्यांसमोर गोड गाणे गायले.

– राहुल काडगे, सांगली

३. परवापरवाच परशुराम पंतांच्या पुत्राने, पंडितने, पाठकांची पैशाची पांढरी पिशवी पळविली. पंडितला पकडण्यासाठी पाठकांनी पाच पोलीस पाठवले. पोलिसांनी पंडितला परांजपेंकडे पेल्यातून पाणी पिताना पाहिले. पोलिसांना पाहताच पंडित पळाला. पण पळता पळता पडलेल्या पंडितला पोलिसांनी पटकन पकडले.

– अश्विनी इनामदार
१० वी, नू. म. वि. मुलींची प्रशाला, पुणे



या देशातील कुत्रं सुद्धा जोपर्यंत उपाशी आहे तोपर्यंत मला मोक्ष नको.

# असे घटते सुंदर अक्षर

ट ठ ढ द क्ष ड ङ इ ई झ ऋ ह अ ज उ ऊ ग म भ

न त र स श प फ ष ण व ब क च घ ध ल ळ छ ख

य थ ट टा टि टी टु टू टे टै टो टौ टं टः ठ ठा ठि ठी ठु

ठू ठे ठै ठो ठौ ठं ठः ढ ढा ढि ढी ढु ढू ढे ढै ढो ढौ ढं ढः

द दा दि दी दु दू दे दै दो दौ दं दः क्ष क्षा क्षि क्षी क्षु क्षू क्षे

# असे घटते सुंदर अक्षर

क्षै क्षो क्षौ क्षं क्षः ड डा डि डी डु डू डे डै डो डौ डं डः ड़ ड़ा

ड़ि ड़ी ड़ु ड़ू ड़े ड़ै ड़ो ड़ौ ड़ं ड़ः इ ई इ ई इ ई इ ई इ

झ झा झि झी झु झू झे झै झो झौ झं झः झ झा झि झी झु झू झे

झै झो झौ झं झः ह हा हि ही हु हू हे है हो हौ हं हः अ आ

अि अी अु अू अे अै ओ औ अं अः ज जा जि जी जु जू जे जै जो

# असे घटते सुदर अक्षर

जौ जं जः उ ऊ उ ऊ उ ऊ ट ठि दी क्षु ई झे झु हृ ङ अ

ट् ठ् ड् ढ् द् क्ष्य झ्या ङ् ह् ह्य हॅ ज्ज ट्य ठ्य ड्य ढ्य

तंटा थट्टा कोष्टक राष्ट्र ट्रॅक्टर कट्यार खोटा

कंठ विठ्ठल ठेच पाठ्यपुस्तक लठ्ठ कर्मठ

गुढी पांढरी बलाढ्य प्रौढ चढ्ढू ढापण पेंढी

सदैव गर्द द्वादशी योद्धा विद्यार्थी लांबरुंद

क्षण पक्ष कक्ष लक्ष क्षय यक्ष दक्ष लक्षण वृक्ष

असे घटते सुंदर अक्षर

डौल खड्डा घड्याळ वाङ्मय वाङ्निश्चय डर

इंद्र इथे इत्यादी इस्लामी इच्छा इरादा इतक्यात

भुई नेईन ईशान्य मंडई लक्ष्मीबाई रुई भुईकोट

झोका झुंड झ्याक झरे लेझीम झटकून झपाझप

यज्ञ रसज्ञ ज्ञान ज्ञात ज्ञानेश्वरी वैज्ञानिक प्रतिज्ञा

नव्हे हिंस्त्र हृदय कुऱ्हाड सह्याद्री नाट्यगृह हिस्सा

रजई इलाज पैज जोखड सज्जन जीवसृष्टी जो

उमेद उष्ण उद्या उत्कृष्ट उत्कर्ष उत्सुकता

ऊन होऊ कर्जाऊ भाऊबीज धुऊन देऊळ खाऊ

पावसाळी सहलींच्या निमित्ताने !!

# मजा .... आनंद ... साहस ... धबधबे अन् जंगलातील चुकणेही ... !

२९ ऑगस्टला पुण्यातील 'छात्र प्रबोधन'च्या सभासदांच्या सहली जाऊन आल्या. मुळात ९ ठिकाणी सहली जाहीर केल्या होत्या पण प्रत्यक्षात ४ ठिकाणीच सहली जाऊ शकल्या. मुलांच्या सहली तोरणा, लोहगड-विसापूर अन् शिवथरघळ येथे, तर मुलींची सहल पुरंदर किल्ल्यावर जाऊन आली. एकूण मिळून ७८ सभासद या सहलींमध्ये सहभागी झाले होते. अनेकजण पहिल्यांदाच अशा सहलींना येत होते. प्रबोधिनीच्या सहली म्हटल्या की मोकळं वातावरण असतं. कुठेही रांगा धरून चालणं नाही की किल्ल्याला भोज्जा करून टाकोटाक परतणे नाही. गड चढण्याचा, नवनवीन वाटा शोधण्याचा, धबधबे अन् पावसामध्ये मनमुराद भिजण्याचा, निसर्गाच्या अवर्णनीय दृश्यांचा आस्वाद घेण्याचा आनंद लुटणे, घडलेल्या ऐतिहासिक घटनांची माहिती घेणे. नवीन मित्र. भरपूर गप्पा. जाताजाता आसपासच्या खेड्यांचे निरीक्षण. तेथील शिक्षण, आरोग्य, राहणीमान, शेती इ. वर खेडूतांशी. तेथल्या मुलांशी बोलणे, हालाखीच्या परिस्थितीतील त्यांच्या जगण्यासंबंधी, मग गटातील चर्चा, वाट सोडून क्वचित प्रसंगी भरकटणे - चुकणे हे सर्व प्रबोधिनीच्या सहलींचं वैशिष्ट्य ! या पावसाळी सहलींमध्ये यातलं बरंचसं बहुतेक सर्वांनी अनुभवलंच पण शिवथरघळच्या सहलीचा अनुभव मात्र जरा अनपेक्षित अन् अनोखाच होता. या सहलीत सहभागी झालेल्या मिहीर दाबके (८ वी, अभिनव विद्यालय) या विद्यार्थ्यांच्या शब्दांतच आपण वाचूया !

**शिवथरघळची अविस्मरणीय सहल !**

५.३० वाजता स्वारगेट एस. टी. स्टँडवर एकत्र जमायचे होते म्हणून ४ वाजताच उठलो. सर्व तयारी करून स्टँडवर आलो. अनेक शाळांमधील ३० अनोळखी मुले एकत्र आली होती. एस. टी. त बसून प्रवासाला सुरुवात झाली. तानाजीची आठवण सांगणारा सिंहगड. मुरारबाजीचा पराक्रम डोळ्यासमोर उभा करणारा पुरंदर, पाण्याने तुडुंब भरलेले भाटघर धरण एस. टी. तूनच पाहात पाहात आम्ही वरंधा घाटात आलो. वाघजाईच्या देवळापाशी खाली उतरलो अन् समोरच्या खोल दरीमध्ये चहूबाजूंनी हिरवीगार झाडी अन् मधूनच प्रचंड उंचीवरून कोसळणारे पांढऱ्या फेसाळ पाण्याचे जणू दुधाचेच धबधबे डोळ्यांना सुखावत होते. तेथील माकडांची चेष्टा करीत पुन्हा गाडीत बसलो. शिवथर फाट्याजवळ उतरलो. अजूनपर्यंत आम्ही सर्वजण एकटे-दुकटेच होतो पण मग प्रत्येकाने स्वत:चे नाव सांगायचे. पुढच्याने मागच्याचे अन् स्वत:चे नाव सांगायचे असा खेळ खेळून ओळख करून घेतली. न्याहारी केली अन् अनोळखी मुलांशी गप्पा सुरू झाल्या. मुख्य रस्ता सोडून आम्ही पायवाटेने शिवथर घळीकडे निघालो. पावसाळा असूनही ढगाळ वातावरणामुळे पावसाने भिजण्याऐवजी घामानेच भिजायची पाळी आमच्यावर आली. सुमारे ११ वाजता मोठा ओढा ओलांडून आम्ही शिवथरघळीत येऊन पोहोचलो. वरून पडणारा धबधबा मोहवत होता. आम्ही सर्व सरांच्या परवानगीची वाट पाहात होतो. रामदासस्वामींचं दर्शन घेऊन येथील घळ पाहून आम्ही धबधब्यात उतरलो. वरून उंचावरून पडणारं पाणी थेट आपल्याच अंगावर पडावं म्हणून अगदी वरपर्यंत गेलो. अंगावर बसणारे फटके अन् पाण्याचा प्रचंड वेग! खूप मज्जा आली. अर्ध्या-पाऊण तासानंतर सर्वजण बाहेर आलो. प्रत्यक्ष शिवथरघळीमध्ये खूप गर्दी होती म्हणून घळीच्या वरच्या डोंगरावर स्वामी श्रीनिवास यांच्या मठात जाऊन जेवण केले. स्वामीजींबरोबर वरच्या धबधब्यावर गेलो. पिंडीच्या आकाराची मोठ्ठी विहीरच तेथे निर्माण जाली होती. सुमारे २००-२५० फूटांवरून प्रचंड मोठा धबधबा खाली कोसळत होता. त्याचे तुषार १०० फूटांपर्यंत लांब अंगावर येत होते. पुन्हा भिजलो. डुंबलो. 'तुषार-स्नान' केले. स्वामीजींबरोबर

**'नौजवान आओ रे, नौजवान गाओ रे !**
**लो कदम मिलाओ रे, लो कदम बढाओ रे !'**
हे स्फूर्तिगीत म्हटलं. त्यांनी पर्यावरणावर सोप्या भाषेत मांडलेले विचार मनात ठसले. स्वामीजी येथील डोंगरातल्या विविध वस्त्यांवरील मुलांना शिकवत होते. येथे विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी पुस्तके देण्याचं आवाहन त्यांनी केलं. झाडांचे संरक्षण करायचे असेल तर कागदांचा वापर काटकसरीने अन् पुरेपूर करण्याचा आग्रह त्यांनी धरला. (कारण झाडांपासूनच कागद तयार होतो.) अखेर ३ वाजता त्यांचा निरोप घेऊन आम्ही एका नवीन वाटेने चालायला सुरुवात केली. आत्तापर्यंत सगळं सुरळीत ठरलेल्या योजनेप्रमाणे होत होतं. परतीच्या प्रवासात घरच्या आठवणी डोके वर काढत होत्या. केव्हा एकदा अनुभवलेली सर्व मज्जा ताईला, आई-वडिलांना सांगू असे झाले होते पण प्रत्यक्षात मात्र वेगळेच घडले. जे घडले ते अनपेक्षित होते पण खूप काही अनुभव देणारे, स्वत:च्या क्षमतांचा कस लावणारे होते. प्रत्यक्ष त्या अनुभवातून जाताना काहीवेळा घाबरलो, ढेपाळलो, प्रसंगी रडलोही पण त्यातून बाहेर आल्यावर मात्र मोठा विजय मिळविला. पराक्रम गाजवला याचा आनंद अधिक होता.

त्याचे असे झाले...

हिर्डोशी गावाच्या दिशेने आम्ही कूच करायला सुरुवात केली. दीड दोन तासांनंतर एक छोटी वस्ती लागली. रस्ता तोपर्यंत बरोबर होता. गावकऱ्यांकडून पुढची माहिती घेतली अन् चालायला सुरुवात केली. एव्हाना आम्ही बरेच दमलो होतो पण पाणी (ओढा, धबधबा) असल्याशिवाय न्याहारी करायची नाही असे सरांनी सांगितल्यामुळे तसेच चालत राहिलो. सरांनी स्फूर्तिगीते सांगितल्यामुळे नकळत चालण्याचा वेग वाढला. उत्साहही वाढला त्याच नादात आम्ही केव्हा रस्ता चुकलो हे कळलेच नाही. तासाभराच्या पायपीटीनंतर एक घर दिसले आणि खूप हायसे वाटले. घरात फक्त एक आजी होत्या. त्यांनी आम्ही रस्ता चुकल्याची पहिली आठवण दिली अन् बाहेर येऊन पुन्हा रस्त्याला कसं लागायचं हे दाखवलं. सहा वाजले होते. खरं तर तासाभरात हिर्डोशीला पोहोचायला हवं होतं. आजींनी एकदीड तासात हिर्डोशी येईल असं सांगितलं. आम्ही रस्ता लक्षात घेतला. एका टेकडीच्या उतारावर थोडीफार न्याहारी केली अन् काहीसे उसने अवसान आणून खाली ओढ्याच्या दिशेने पुढे सरकलो. ओढ्याच्या काठाकाठाने बरेच पुढे गेलो. मध्येच रस्ता नाहीसा झाला. एव्हाना अंधारही पडला होता. सरांनी रविदादाला आमच्या बरोबर ठेवले. आम्हाला एका ठिकाणी थांबायला सांगितले अन् सचिन, गिरीश यांना घेऊन महेन्द्र सर रस्ता शोधण्यासाठी पुढे गेले. १५-२० मिनिटांत परत येतील असे समजून आम्ही स्वस्थ बसलो. इतका वेळ लपून बसलेल्या पावसाने आपली ओळख आम्हाला करून दिली. धो-धो पाऊस सुरू झाला. कुडकुडत आम्ही त्या जंगलात महेंद्र सरांची वाट पाहात होतो. खरं तर आम्ही सगळेच ढेपाळलो होतो. काहीजण तर रडलेही. काळजी, भीती इ. भावनांनी आम्ही फक्त वाट पाहात होतो. रविदादाने मग एक शक्कल काढली. उत्साह, धैर्य अन् शरीरातील ऊब टिकवून ठेवण्यासाठी मग आम्ही जोरदार गाण्यांच्या भेंड्या सुरू केल्या. दोनअडीच तास होऊन गेले पण सरांचा पत्ताच नव्हता. अनेक शंका-कुशंकांनी सर्वांच्या मनाला घेरले होते. आता काय होणार असा मोठा प्रश्न सर्वांसमोर उभा. मोठमोठ्याने हाका मारून आम्ही प्रतिसादाची वाट पाहात होतो पण प्रत्युत्तर मिळत नव्हते. अखेर रात्री साडेदहा वाजता सरांचा अस्पष्ट आवाज ऐकू आला आणि आम्ही सर्व क्षणभर स्तब्ध झालो. कानोसा घेतला अन् ओळखीचा. सरांचाच आवाज अधिक स्पष्ट ऐकू येऊ लागल्यावर आनंदाने आम्ही सर्वांनी मिळून मोठ्याने हाक मारली. अन् काही क्षणातच सर दिसले अन् मग मात्र खूप हायसं वाटलं तो क्षण वर्णन करण्याच्या पलिकडचा आहे.

*(पान क्रमांक ३४ वर पुढे चालू)*

## प्रश्नकौशल्यांचा वापर

*(पान क्रमांक ८ वरून पुढे चालू)*

असते. चांगले काय, वाईट काय, बरोबर काय हे बघायचे असते. एखादी गोष्ट व्यवहारोपयोगी आहे की निरर्थक आहे – थोडक्यात त्या गोष्टींचे मूल्य काय आहे हे ठरवायचे असते. एखाद्या गोष्टीविषयी स्वत:चे मत प्रकट करायचे असते. मूल्यमापनात्मक प्रश्नांची काही उदाहरणे पाहू.

१) राजाराममोहन रॉय यांच्या कार्याचे महत्त्व विशद करून सांगा.

२) पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर करावा का? तुमचे मत स्पष्ट करा.

३) मोठी धरणे बांधल्याने फायदा अधिक होईल की लहान लहान धरणांमुळे फायदा अधिक होईल? तुम्हाला कोणता पर्याय अधिक चांगला वाटतो?

४) दहावी व बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा रद्द कराव्यात व ज्या त्या शाळेने आपापली परीक्षा घ्यावी. याविषयी व एकूणच सध्याच्या परीक्षा पद्धतीविषयी तुम्हास काय वाटते?

मूल्यमापनात्मक प्रश्न हे एक प्रकारे दीर्घोत्तरी प्रश्न असतात व त्यांची उत्तरे लिहिताना समतोल विचार करण्याची आवश्यकता असते. स्वत:चे मत मांडत असताना ते एकांगी व टोकाचे होणार नाही याची काळजी घ्यावी लागते.

**रसग्रहणात्मक प्रश्न** हे साधारणपणे भाषेच्या अभ्यासामध्ये विचारले जातात. एखाद्या साहित्यकृतीचा अनेक बाजूंनी आस्वाद घेता यावा, त्यातील कोणत्या गोष्टी आपल्याला विशेष आवडल्या, अथवा आवडल्या नाहीत ते सकारण सांगता यावे. उताऱ्यामधील शब्दांचे, अलंकारांचे, शैलीचे, अर्थाचे सौंदर्य आपल्याला अनुभवता यावे यासाठी रसग्रहणात्मक प्रश्न विचारले जातात. उदा :- खालील प्रश्न पहा. 'श्रावणमासी' या बालकवींच्या कवितेवरील १) 'श्रावणमासी' या कवितेमध्ये उत्प्रेक्षा या अलंकाराची कोणकोणती उदाहरणे आलेली आहेत? २) या कवितेमधील चपखल विशेषणांची दोन उदाहरणे सांगा. ३) या कवितेमधून श्रावणातील निसर्गाचे चित्र कवीने कशाप्रकारे उभे केले आहे? ४) या कवितेतील कोणती ओळ तुम्हास जास्त आवडली व का?

आता सृजनात्मक प्रश्नांविषयी थोडे सविस्तर पाहू या. तत्पूर्वी प्रश्नांचे आणखी एका प्रकाराने वर्गीकरण केले जाते ते समजावून घेऊ. प्रश्नांचे दोन प्रकार असतात.

१) एकलक्षी प्रश्न २) बहुलक्षी प्रश्न

**एकलक्षी प्रश्नां**मध्ये एका प्रश्नाचे एकच उत्तर अपेक्षित असते. यापूर्वीच्या लेखांमधून विचारलेले वस्तुनिष्ठ वा लघुत्तरी, दीर्घोत्तरी प्रश्न हे एकलक्षी प्रश्नांचीच सवय असते. याउलट **बहुलक्षी प्रश्न** म्हणजे ज्या प्रश्नांची अनेक उत्तरे असू शकतात अथवा ज्या प्रश्नांना अनेक प्रतिसाद असू शकतात असे प्रश्न होत. बहुलक्षी प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपल्याला अनेक बाजूंनी अनेक दिशांनी विचार करावा लागतो. त्यामुळे आपली बौद्धिक विचारशक्ती वाढते. उदा. पाण्याचे जास्तीत जास्त व वेगवेगळे उपयोग सांगा. हा प्रश्न पहा. पाण्याचे उपयोग म्हटले की पाणी पिण्यासाठी, धुण्यासाठी, आंघोळीसाठी लागते हे सगळेजण चटकन सांगतात मग पाण्याचे वेगळे उपयोग कोणते? खालील प्रतिक्रिया पाहा. १) पाणी हे द्रावण

तयार करण्यासाठी द्रावक म्हणून लागते. उदा. : शाई, रंग, मीठ, साखर, इ. चे द्रावण.

२) पाणी हे वाहतुकीसाठी लागते. उदा. जहाजातील वाहतूक.

३) पाणी वीजनिर्मितीसाठी लागते.

४) पाणी आग विझविण्यासाठी लागते.

५) पाणी बर्फ तयार करण्यासाठी, तपमान कमी करण्यासाठी लागते.

६) पाणी रंगपंचमी खेळण्यासाठी, फुग्यात भरण्यासाठी लागते.

७) जलतरंगासारख्या वाद्यांसाठी लागते.

८) हायड्रॉलिक ब्रेक्ससाठी वापरले जाते.

९) वांगी, बटाटे यासारख्या काळ्या पडणाऱ्या भाज्यांच्या फोडी पाण्यात ठेवल्या जातात. यासारखे आणखी कितीतरी उपयोग लिहिता येतील.

सध्याच्या परीक्षांमध्ये बहुलक्षी प्रश्नांना अजिबात स्थान दिलेले नाही. ते यापुढे दिले पाहिजे असे मला वाटते.

**सृजनशील प्रश्न** म्हणजे प्रतिभेला, कल्पना शक्तीला चालना देणारे प्रश्न. साधारणपणे हे प्रश्न बहुलक्षी प्रश्न असतात. प्रतिभा म्हणजे काय? अगदी थोडक्यात सांगायचे झाले तर प्रतिभा म्हणजे नवनिर्मिती, प्रतिभा म्हणजे नवीन कल्पना सुचणे, इतरांपेक्षा अगदी वेगळ्या अभिजात कल्पना सुचणे. या कल्पना तुम्हाला भाषेमध्ये सुचू शकतील अथवा विज्ञानामध्येदेखील सुचू शकतील. अगदी वेगळ्या अशा कल्पनांचा उपयोग जर तुम्ही तुमच्या निबंधामध्ये, कवितेमध्ये, कथेमध्ये केलात तर त्याचा खूपच प्रभाव पडेल. यासाठी आपल्या कल्पनाशक्तीला ताण देण्याचा, व्यायाम देण्याचा सराव करायला हवा. त्यासाठी सृजनशील प्रश्नांचा वापर करायला हवा. सृजनशील प्रश्नांची काही उदाहरणे पाहूया.

१) नेहमीच्या काळ्या छत्रीपेक्षा नवीन वेगळ्या प्रकारची, सध्या बाजारात उपलब्ध नसलेली अशी छत्री तयार करायची आहे. तर नेहमीच्या छत्रीमध्ये तुम्ही कोणकोणत्या नवीन सुधारणा सुचवाल?

२) सुई व बूच यांचा विविध प्रकारे उपयोग करून कोणत्या नवीन वस्तू तुम्ही बनवाल?

३) जर झाडे चालू लागली तर काय काय परिणाम घडतील?

४) प्राणी व वनस्पती यांच्या संकराने जर नवीन जीव तयार झाला तर तो कसा असेल? त्याचे काय काय परिणाम घडू शकतील?

याप्रकारचे प्रश्न हे आपल्या कल्पनाशक्तीला चालना देणारे प्रश्न आहेत. साधारणपणे जर-तरचे प्रश्न हे सृजनशील प्रश्न असतात. एखाद्या गोष्टीच्या, प्रयोगाच्या निरीक्षणातून असे 'जर-तर' हे प्रश्न आपल्याला काढता येतील. उदा: १) जर तापमापकात पाऱ्याऐवजी अल्कोहोल वापरले तर काय होईल? २) जर रंगीत मीठ तयार करता आले तर? ३) जर झाडांना संगीत ऐकवले तर त्यांच्या वाढीवर काय परिणाम होईल?

भाषेमध्ये तर अनेक प्रकारचे सृजनशील प्रश्न विचारता येतील. उदा. : १) एखादा शब्द घेऊन त्याला अनेक नवीन नवीन विशेषणे शोधून काढणे, उदा. : अ) ऊन, पाऊस, अंधार, फूल इ. शब्दांसाठी सुंदर व वेगळी विशेषणे सुचवा.

ब) एखादे वाक्य देऊन त्या वाक्यात विशेषणे, क्रियाविशेषणे, वाक्प्रचार व उपमा, उत्प्रेक्षा, रूपक यासारखे अलंकार वापरून ते वाक्य अनेक प्रकारांनी व अधिक सुंदर असे कसे लिहिता येईल? उदा. : माधवला परीक्षेतील यशाने आनंद झाला. हे वाक्य अधिक सुंदर होईल अशा प्रकारे

निदान दहा वेगवेगळ्या प्रकारांनी लिहून दाखवा. या प्रश्नाचे उत्तर लिहिताना आपल्याला माधव, परीक्षा, यश व आनंद या शब्दांसाठी विविध विशेषणे वापरता येतील. जसे 'कुशाग्रबुद्धीचा, कष्टाळू, मेहनती, हुशार, बुद्धिमान, तल्लख बुद्धीचा माधव व परीक्षेसाठी अवघड, कठीण, खडतर, स्पर्धापरीक्षा अशी विशेषणे वापरता येतील. यशासाठी नेत्रदीपक, झळाळणारे अद्वितीय, अत्युच्च इ. विशेषणे वापरता येतील. आनंद झाला या अर्थी 'आनंदाचे भरते आले' 'आनंद गगनात मावेना' 'आनंदाला पारावार राहिला नाही' असे वाक्प्रचार वापरता येतील. अलंकारांचा वापर करायचा झाल्यास आनंदाची कारंजी थुईथुई नाचू लागली. आनंदाचा धबधबा ओसंडून वाहू लागला. माधव म्हणजे एक झळाळणारा हिरा किंवा अनमोल रत्नच होतं, सोनं जसं अग्निपरीक्षेतून अधिकच उजळते त्याप्रमाणे माधवच्या परीक्षेतील यशामुळे त्याची बुद्धी अधिकच उजळून निघाली इ. प्रकारांनी अधिक सुंदर वाक्ये रचता येतील. याप्रमाणे सृजनशील प्रश्नांचा उपयोग भाषेतील कल्पनाशक्ती वाढविण्यासाठी निश्चितच करता येईल.

प्रश्न कौशल्यांचा विचार केवळ परीक्षेपुरता करून चालणार नाही तर आपली विचारशक्ती वाढावी, कल्पनाशक्ती वाढावी, आपल्या हातून नवीन नवीन संशोधन व्हावे अशा अनेक मोठ्या उद्दिष्टांसाठी आपल्या गुणवत्ता वाढीसाठी या लेखामध्ये प्रश्नांचे जे विविध प्रकार सांगितले आहेत ते विद्यार्थ्यांनी आत्मसात करायला हवेत.

***

## प्रार्थना

लवकरच गणेशोत्सवाची धामधूम संपेल. १० दिवस खूप उत्साहात जातील. या निमित्ताने गणरायाकडे काय मागणे मागूयात! वर्षभर श्रीगणेशाचे स्मरण करताना खालील प्रार्थना आपण सदैव म्हणूयात.

**हे गणराया !**
**तू संघटनेची देवता आहेस**
**तुला स्मरून आम्ही असा संकल्प करतो की**
**आम्ही सर्वजण एकदिलाने राहू**
**हाती घेतलेले कार्य सिद्धीस नेण्याचा**
**सर्व शक्तीनिशी प्रयत्न करू**
**व्यक्तीपेक्षा कार्य मोठे असते**
**हा मंत्र आम्ही सदैव लक्षात ठेवू**
**आणि त्यानुसार कार्याच्या हितासाठी**
**वैयक्तिक स्वार्थाला तिलांजली देऊ**
**हे बुद्धिदायका !**
**तू सर्व विद्या आणि कलांचा**
**अधिष्ठाता आहेस**
**आमच्या देशात**
**जीवनाच्या सर्व क्षेत्रात**
**सदैव नवीन संशोधन व्हावे**
**ते ज्ञान समाजाच्या कारणी लागावे**
**आणि त्यातून सर्व समाजाचे जीवन**
**संपन्न आणि समृद्ध बनावे**
**अशा प्रकारे प्रयत्न करण्याची बुद्धी**
**तू आम्हा सर्वांना दे !**

***

(ज्ञान प्रबोधिनी प्रणीत 'श्रीगणेश स्थापना' या पोथीतून)

# ओळख महाराष्ट्राची (भाग २) भौगोलिक महाराष्ट्र

**– सुरेंद्र ठाकूरदेसाई, पुणे**



मागच्या लेखात आपण महाराष्ट्राची प्राकृतिक रचना व नद्या यांचा विचार केला. या लेखामध्ये आपण नद्यांचा विचार जास्त विस्ताराने करूया.

नदीला आपण जीवनदायिनी असे म्हणतो. अनेक ठिकाणी नदी हेच पाण्याचे मुख्य साधन असते परंतु नदीचे स्वरूप. तिचे पाणी हे सर्व त्या भागातल्या हवामानावर अवलंबून असते. याकरता आपण महाराष्ट्राच्या हवामानाची थोडक्यात माहिती घेऊ. महाराष्ट्र उष्णकटिबंधीय मान्सून प्रकारचे हवामान असलेला प्रदेश आहे. असे असले तरी महाराष्ट्राच्या हवामानात खूप विषमता आढळते. हा बदल फक्त तापमानातला नसून तो पावसाचा काळ, प्रमाण, तीव्रता या सर्वांमध्ये आहे. महाराष्ट्रात सर्वात जास्त तापमान मे महिन्यात असते. यावेळेला सरासरी तापमान समुद्रकिनारी ३२° सें. तर विदर्भात ४२° सें. पेक्षा जास्त असते. आपल्याकडील सर्वात थंड महिने डिसेंबर व जानेवारी हे असतात. या महिन्यांमध्ये किनारपट्टीमध्ये २०° सें. तर अंतर्गत भागात ११° सें. पेक्षा सरासरी तापमान असते. यावरूनच महाराष्ट्राच्या हवामानातील विषमता समुद्रकिनाऱ्यापासून दूर गेल्यावर वाढत जाते हे दिसून येईल. महाराष्ट्रातील पावसाचे वार्षिक प्रमाणदेखील ४५० मि.मी. ते ६००० मि.मी. इतके विषम आहे. समुद्रकिनारी २०००–३००० मि.मी. घाटमाथ्यावर ४०००–६००० मि.मी., मराठवाड्यात ४००–४५० मि.मी. पाऊस पडतो. पुन्हा पूर्वेकडे पाऊस वाढतो व पूर्व सीमेवर १२००–१५०० मि.मी. पाऊस पडतो. महाराष्ट्रात सर्वात जास्त पाऊस जुलै महिन्यात पडतो. 'आंबोली' हे महाराष्ट्राचे 'चेरापूंजी' आहे. इथे सरासरी ७४७७ मि.मी. पाऊस पडतो.

वरील सर्व माहिती वरून लक्षात येईल की फक्त चार महिने पाऊस पडतो व वर्षभर तापमानसुद्धा

जास्त असते त्यामुळे उन्हाळ्यात नद्या कोरड्या पडतात. अशा वेळेला पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवण्याकरता धरणे बांधली जातात. धरणांचा वापर हा मुख्यत: जलसिंचन, बीजनिर्मिती, पूरनियंत्रण, पिण्याचे पाणी इ. साठी होतो. एकाहून अधिक गरजा भागवणाऱ्या प्रकल्पांना बहुउद्देशीय प्रकल्प म्हणतात.

महाराष्ट्रात सह्याद्रीमध्ये खूप पाऊस पडतो व धरणे बांधायला सोयीच्या जागाही उपलब्ध आहेत. म्हणून बहुतेक धरणे नद्यांच्या उगमाजवळ म्हणजे पश्चिम महाराष्ट्रात आहेत. त्यामानाने पूर्व महाराष्ट्रात धरणे कमी आहेत. कोकणातील भौगोलिक परिस्थितीमुळे तिथे धरणे बांधणे अवघड आहे. महाराष्ट्रातील प्रमुख धरण प्रकल्पांची माहिती खाली दिली आहे.

धरणाकरता कोणती भौगोलिक परिस्थिती आवश्यक आहे याची माहिती मिळवा व स्वत:च्या गावाला पाणी पुरवण्यासाठी उपयुक्त होईल अशी गावाजवळील धरणाची जागा शोधा. धरणामुळे निर्माण होणारे प्रश्न कोणते ते शोधा. ✿ ✿

| प्रकल्प | नदी | धरणाचे स्थान | ओलीता खालील क्षेत्र | पाण्याचा उपयोग |
|---|---|---|---|---|
| मुठा<br>(सर्वांत जुना<br>प्रकल्प) | अंबी<br>मोसे<br>मुठा | पानशेत<br>वरसगांव<br>खडकवासला | ६८०० हेक्टर<br>(१४० कि.मी. लांब कालवा) | वीजनिर्मिती<br>जलसिंचन<br>पुणे जिल्ह्यात |
| टाटा | मुळा<br>आंद्रा<br><br>इंद्रायणी | मुळशी<br>वडेश्वर<br><br>वळवंड | | २७६ मेगावॅट<br>वीजनिर्मिती<br>कोकणामध्ये भिवपुरी<br>खोपोली व भिरा येथे |
| भीमा | पवना<br>भीमा | फागणे, चासकमान<br>उजनी | १,७२,८९० हेक्टर<br>४५४ कि.मी. लांबीचे कालवे | जलसिंचन पुणे<br>व सोलापूर जिल्ह्यात |
| नीरा | वेळवंडी<br>नीरा | भाटगर<br>वीर | ८२.७३० हेक्टर<br>४३३ कि.मी. चे कालवे | पुणे, सातारा,<br>सोलापूर सिंचन |
| कृष्णा | कृष्णा, वेण्णा | धोम, कणेर | १०६२९० हेक्टर | सातारा व सांगली |
| कोयना | कोयना | हेळबाक | – | वीजनिर्मिती ८९०<br>मेगावॅट कोकणात<br>पोफळी येथे |
| पंचगंगा | भोगावती | राधानगरी | १०००० हेक्टर | जलसिंचन कोल्हापूर<br>१ मेगावॅट वीजनिर्मिती |
| कुकडी | घोड, कुकडी<br>पुष्पावती | डिंगे, राजुर<br>पिंपळगावजोगा | ४२७९० हेक्टर | जलसिंचन<br>पुणे अ. नगर |
| गोदावरी | वारणा, प्रवरा<br>वाघ, गोदावरी | कोपरगांव, भंडारदरा<br>सीरपूर, जायकवाडी | ३२१५० हे. २३००० हे.<br>३३०० हे. २५१००० हे. | जलसिंचन पुणे, नाशिक<br>अ. नगर, भंडारा,<br>औरंगाबाद, परभणी |
| इटियाडोह | गार्वी | गोठणगांव | ४६.१४० हेक्टर | जलसिंचन गडचिरोली |

# असंही जगणं असतं ! ......

**सौ. बागेश्री पोंक्षे**

परीक्षा जवळ आली होती. अविनाश शाळेतून परतला. चाळीच्या मोडकळीस आलेल्या जिन्यावरून खाली उतरणाऱ्या लोकांना जागा देत अंग चोरून वर चढताना त्याच्या अनवाणी पायांची आग होत होती. अविनाशच्या डोळ्यासमोर पुस्तकांची पाने फडफडत होती. त्याचे हे दहावीचं वर्ष होतं. सगळी पुस्तकं कोरी करकरीत वाट्याला येण्याचं भाग्य गेल्या दहावर्षांच्या त्याच्या शालेय जीवनात तरी उजाडलं नव्हतं. अलीकडेच काही वर्षांपासून परदेशी व्यक्तींनी इथल्या काही विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्याच्या एका योजनेत त्याला परदेशी पालक मिळाले होते. त्याच्या शाळेचे मुख्याध्यापक आणि तो ज्या संस्थेत खेळायला - शिकायला जाई तिथले युवा शिक्षक यांच्या प्रयत्नांमधून शाळेचा नवीन गणवेष आणि त्याच्या प्रिय पुस्तकांचा येणारा वास व स्पर्श यांचा



अनुभव तो घेत होता आणि सुखावत होता. खरं म्हणजे अविनाशला कडकडून भूक लागली होती. कधी एकदा घरात जातो आणि काहीतरी पोटात ढकलतो असे त्याला झाले होते.

पण जिन्यावरून जातानाच घरातील एकंदर परिस्थितीचा अंदाज चटकन त्याला आला. अविनाशचे घर ! मांडी घालून मध्यभागी बसले तर चोहोबाजूंन दोन्ही हात जेमतेम फैलावता येतील एवढ्या मोठ्या घरामध्ये अविनाश, त्याची बहीण सीमा व आई-बाबा रहात असत.

बाहेर उंबऱ्याबाहेर पडलेल्या वस्तूंच्या ढीगावरून आणि घरातून येणाऱ्या आवाजावरून आजही घरात काय परिस्थिती असेल याचा अंदाज एका निमिषात् त्याच्या मनाला आला आणि आधीच रिकाम्या असलेल्या पोटात भीतीने मोठ्ठा खड्डाच पडला. अनिच्छेनेच त्याने घरात पाऊल टाकले. व्यसनाच्या आधीन झालेल्या त्याच्या वडिलांची कृश, अशक्त मूर्ती जोरजोरात हातवारे करीत, नेहमीचीच बडबड पुन्हा नव्याने करीत होती. कोपऱ्यात दिवसभराच्या श्रमांनी आणि मानसिक क्लेशांनी क्लांत झालेली पण चेहऱ्यावरचा प्रसन्नपणा जराही रेषभरही कमी न करण्याचे सतीचे वाणच जणू स्विकारलेली त्याची आई स्टोव्हवर चहाचा खटाटोप करीत होती.

पाहतो तर काय अविनाशच्या काळजात एक अनामिक भावनातिरेकाने कळच उठली. त्याने त्याच्या मामाने त्याला दिलेल्या हिरव्या रंगाच्या पत्र्याच्या पेटीत ठेवलेली अगदी कुलूप घालून बंद केलेली त्याच्या शिक्षकांनी

त्याला बक्षिस दिलेली शाळेची पुस्तके, वह्या यांची काही पाने जाळलेली, फाडलेली, विखुरलेली दिसत होती आणि काही पुस्तकांची आणि वह्यांची रवानगी दारूच्या बाटलीतून बाबांच्या पोटात झालेली दिसत होती. तो मटकन खालीच बसला. त्याला समोरचे काही दिसेचना !

आता काय करायचे? त्याच्या काळ्याभोर, चमकदार, टपोऱ्या डोळ्यांमधून भराभर अश्रू अनावरणपणे ओघळू लागले. मूकपणाने उरलेली सर्व पाने त्याने गोळा केली.

तेवढ्या गोंधळातही आईने केलेला चहा व पोळी मुकाट्याने पोटात ढकलली आणि जड पायांनी शाळेचे दप्तर उचलून तो संध्याकाळच्या शाखेत जाण्यासाठी पायऱ्या उतरू लागला.

अविनाशच्या आयुष्यातील या काळातच त्याच्या सायंकाळच्या शाखेत एक छोटेसे काम करण्याची सुसंधी मला मिळाली आणि छोट्याशा अविनाशकडून कबड्डी-खोखो आट्यापाट्या, प्रार्थना, सहली, शिबिरे गप्पा यांच्या माध्यमामधून बरंच काहीतरी घेण्याची संधीही मला मिळाली.

मैदानावरील गप्पांमधून हा अविनाश आणि इतर अनेक अविनाश, किशोर, सारंग, सागर यांच्याकडून बरंच काही मी मिळवलं. नुसतं परीक्षांमध्ये पहिला नंबर, सर्वच्या सर्व गुणच नव्हे तर सुंदर अक्षर, विनयशील वागणं, नम्रता, गुणग्राहकता, चिकाटी आणि जीवनावरील प्रचंड प्रचंड विश्वास !

कशाचीही तक्रार न करता, जरासुद्धा न कुरकुरता आपल्या वाट्याला आलेल्या जीवनाला आहे तसे स्वीकारून या जीवनाच्या परीक्षेतही अगदी वरचा नंबर कसा मिळवायचा हे मी अविनाशकडून शिकले.

आत्ता आपल्याला जिन्याच्या पायऱ्यांवर जड अंत:करणांनी उतरत असलेला अविनाश जो दिसला तो पुन्हा मला भेटला तेव्हा अगदी न ओळखू येणारा हसरा, हसतमुख, उमद्या मनाचा तरुण बनून भेटला. सर्व अडचणींमधून मार्ग काढून अभियांत्रिकीच्या परीक्षेत विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण झालेला हा अविनाश जेव्हा स्वत:बरोबर १०-१२ अंध विद्यार्थ्यांना एम्. ए., एम्. कॉम पर्यंत शिक्षण घ्यायला मदत करतो. स्वत: नोकरी करत असून ज्या शाखेतील, शाळेतील शिक्षक-कार्यकर्त्यांच्या मदतीने त्याने लौकिक/अलौकिक दोन्हीही प्रकारचे यश मिळवले अशा कार्यकर्त्यांकडून/शिक्षकांकडून घेतलेले सर्व वसे जसेच्या तसे पाळणारा, न टाकणारा अविनाश मला भेटला तेव्हा मी आश्चर्याने थक्क होऊन खरंच असंही जगणं असतं असंच मनाशी म्हणाले.

त्याच्याकडे पाहिलं की नेहमीच मला रविंद्रनाथांच्या कवितेच्या ओळी आठवतात. अविश्रांतपणे श्रमणाऱ्या आणि सतत काहीतरी करत राहून आपण घेतलेले मातृऋण, समाजऋण अंशत: फेडण्याचा प्रयत्न करणाऱ्या अविनाशला पाहून मी नकळत त्या रविंद्रनाथांच्या ओळी म्हणून गेले.

**कोण करील माझे काम**

**म्हणे संध्यारवी**

**सगळे जग जणू बनले निरुत्तर छबी**

**कोपऱ्यात पणती मिणमिणती**

**हळूच म्हणाली देवा**

**माझ्याच्याने होईल तेवढी करीन तुझी सेवा !**

**करीन तुझी सेवा !**

✿ ✿

# आम्हीच लिहिणार आमचे पान !

## हसा–हसा .....

एका गावामध्ये एक मोठे देऊळ होते. एका कुटुंबातील तीन भावांकडे त्या मंदिराच्या पूजेची सर्व व्यवस्था होती. मंदिराच्या दानपेटीमध्ये भक्तांनी टाकलेल्या पैशांचे काय करायचे. त्यातले आपण किती घ्यायचे अन् देवळाच्या अन्य व्यवस्था अन् सामाजिक कामासाठी किती पैसे द्यायचे याबाबत तिघाही भावांमध्ये चर्चा सुरू झाली. पहिला म्हणाला, ''आपण देव्हाऱ्यामध्ये एक रेष आखूयात आणि थाळीमध्ये पैसे घेऊन देव्हाऱ्या बाहेरून आत पैसे टाकूयात. रेषेच्या पलिकडे पडलेले पैसे देवाचे अन् अलिकडचे आपले.''

दुसरा म्हणाला, ''त्यापेक्षा आपण एक गोल आखूयात. या गोलाच्या मध्यावर ताट धरून ताटातील पैसे उंचावरून खोली सोडूयात. गोलामध्ये पडतील ते पैसे आपले त्याच्या बाहेरचे देवाचे.''

तिसरा इतका वेळ कुठल्याशा विचारात मग्न होता. अन् तो एकदम म्हणाला ! ''नवीन कल्पना ! आपण ताटातले पैसे वर आकाशाच्या दिशेने फेकू, वर आकाशातले देव त्यांना हवे असतील तेवढे पैसे काढून घेतील. जेवढे पैसे खाली पडतील ते आपले.''

– शंतनु गायकवाड, ९ वी अहमदनगर

## शब्दकोडे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | | | ३ |
| | | | | ४ | |
| ५ | | | ६ | | |
| | | ७ | | | |
| | ८ | | ९ | | १० |
| ११ | | | | | |

**आडवे शब्द :** १. जहाज ४. कागद ५. अट ६. नवस ७. पराभवाने गार झालेला ९. स्वार्थ ११. येथे तीन युद्धे झाली


**उभे शब्द :** १. विद्यादेवता २. ताकद ३. मजुरांशी माझी दोस्ती, मातीशी माझी मस्ती ४. दुधाचे पदार्थ ६. एक जात ८. हा रंग. उल्टा सांगा १०. निरुपयोगी गवत

**– आशुतोष बापट,**
७ वी, अभिनव विद्यालय, पुणे

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ती | र | क | मा | न | |
| न | स | | न | | र |
| ते | | आ | स | पा | स |
| रा | ख | ण | | व | द |
| हो | डी | | टा | क | |
| णे | | स | च | | सा |

## असेही एक पत्र !



 संघटना हे मोठे सामर्थ्य आहे आणि आज्ञाधारकपणा हे संघटनेचे बीज आहे.


भाग २

– सौ. अनघा लवळेकर

स्वतंत्र भारताचं पहिलं दशक मोठ्या उमेदीनं भविष्याला सामोरे जाण्याची तयारी करत असतानाच फाळणी, युद्ध, गांधीहत्या अशा धक्क्यांना तोंड द्यावं लागलं पण त्याच सोबत संस्थाने विलीनीकरणाचं महत्त्वाचं कामही पटेलांच्या कणखर नेतृत्वानं पार पाडलं.

२६ जानेवारी १९२९ या दिवशी झालेल्या काँग्रेसच्या लाहोर येथील राष्ट्रीय अधिवेशनात 'पूर्ण स्वराज्या'ची मागणी ठामपणे मांडण्यात आली होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर प्रकर्षाने या दिवसाची स्मृती सर्वच नेत्यांना जपावीशी वाटली. स्वातंत्र्य जरी १५ ऑगस्ट ४७ ला मिळालं असलं तरी भारतीय प्रजासत्ताकाचा प्रारंभ २६ जानेवारीला करावा असं निश्चित झालं आणि २६ जानेवारी १९५० या दिवसापासून खऱ्या अर्थाने 'भारत' एक 'सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र' म्हणून उदयाला आला. त्याच दिवशी भारताची घटना सर्व देशभर लागू करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पट्टाभिसीतारामय्या, डॉ. राजेंद्रप्रसाद, पं. नेहरू अशा विद्वान आणि समाजपरिस्थितीची जाण ठेवणाऱ्या बारा जणांच्या समितीनं ह्या घटनेची बारीक सारीक तपशीलांसह निर्मिती केली. डॉ. आंबेडकरांचा यावरील प्रभाव मोठा असल्यानं 'घटनेचे शिल्पकार' म्हणून ते गौरविले गेले. न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुत्व आणि एकात्मता अशा मूल्यांना पायाभूत ठेवून, या मूल्यांची जोपासना करण्याचा दृष्टिकोन घटनेमध्ये असावा अशी रचना केली होती. लोकशाहीची कल्पना अगदी सर्वसामान्यांपर्यंत पोचावी याकरता घटनेच्या अनेक छोट्या छोट्या कलमांत तरतूद करण्यात आली. विशेषत: किसान, कामगार, स्त्रिया, मागासवर्गीय लोक ज्यांना सतत कुणाच्या तरी दबावाखाली राहावं लागतं अशांना अन्यायाची दाद थेट मागता यावी अशी व्यवस्था केली गेली. वस्तुत: आदर्श म्हणून ह्या सर्व तरतुदी खरोखरच उत्तम आहेत पण व्यवहारात त्या अंमलात आणता आल्या का? खेडोपाडी, रानावनात, दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या भारतीय समाजाच्या निरक्षर आणि अज्ञानी असणाऱ्या एका मोठ्या हिश्श्यापर्यंत त्या पोचल्या का? याची उत्तरे पुढील काळात घडलेल्या घटनांवरून आपल्याला शोधायची आहेत.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पं. जवाहरलाल नेहरू यांनी शपथ घेतली तर पहिले राष्ट्रपती होते पंडित राजेंद्रप्रसाद. एवढ्या मोठ्या देशाची धुरा सांभाळून प्रगतीच्या दिशेने मार्गक्रमणा करायची असेल तर नेत्याच्या डोळ्यापुढे पाच, दहा, पंधरा, पन्नास वर्षांची काही निश्चित उद्दिष्टे असावी लागतात. पाच वर्षांचा कालावधी त्यादृष्टीने पुरेसा आहे असं मानून 'पंचवार्षिक योजना' राबविण्याचे ठरले. राजकीय स्थित्यंतरे, निवडणुका ही दर पाच वर्षांनी घेण्याची तरतूद असल्याने हे सोयीचे होते. (अर्थात् राजकीय परिस्थितीतल्या टोल्यांमुळे हा काळ कधी सात तर कधी दीडच वर्षाचाही झाला हे वेगळे) त्याप्रमाणे नियोजन मंडळाची स्थापना १९५० साली झाली आणि १९५२ पासून पहिली पंचवार्षिक योजना लागू करण्यात आली. यात मुख्यत: रोजगारात वाढ करणे, स्वयंपूर्णतेकडे वाटचाल, सर्वसामान्य जनतेचे राहणीमान उंचावणे आणि त्यांच्या किमान गरजांची पूर्तता करणे (म्हणजेच शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, वाहतूक, वीज,



गृहनिर्माण इ.) यावर भर देण्यात आला.

पंडित नेहरू हे औद्योगिकीकरणाचे खंदे पुरस्कर्ते होते. परदेशासारखे अतिभव्य असे उद्योग भारतात उभे रहावेत अशी त्यांची इच्छा होती. त्यादृष्टीने त्यांनी शासकीय स्तरावर भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लि. सारख्या उद्योगांच्या स्थापनेवर भर दिला. त्याचप्रमाणे नद्यांवर मोठी धरणे बांधून अधिकाधिक भूमी सिंचित करण्यावरही त्यांचा जोर होता. प्रसिद्ध अशा 'भाक्रा-नांगल' धरणाचे काम याच काळात सुरू झाले. हे उद्योग, ही धरणे भारताची 'आधुनिक तीर्थस्थळे' बनावीत अशी त्यांची आकांक्षा होती. ही पहिली पंचवार्षिक योजना १९५२ ते १९५५-५६ या काळात राबविली गेली.

संस्थानं विलीनीकरणाचं अवघड आव्हान पेलून दाखविणारे सरदार वल्लभभाई पटेल यांना अजून एका राष्ट्रीय अस्मितेच्या प्रतिकाची आठवण झाली. गझनीचा महंमद आणि क्रूरकर्मा औरंगजेब यांनी केलेल्या विध्वंसाच्या जखमा उरावर बाळगून एक मंदिर पुन: पुन: आकाराला येत होते. भंगत होतं. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील बारा ज्योतिर्लिंगातील एक, अत्यंत रमणीय समुद्रकिनारा लाभलेलं, सोरटी सोमनाथचं शिवालय ! मूळ मंदिराच्या स्थानावर भग्नावशेषच शिल्लक होते. सरदारांनी या महादैवताची पुन: स्थापना करण्याचा निश्चय केला; तोही अत्यंत भव्य असं देवालय पुन:श्च बांधून. ज्या पाशवी शक्तींनी ह्या स्थानाचा आंधळेपणे, सूडबुद्धीने विध्वंस केला होता त्यांना हे जणू एक रचनात्मक, विधायक उत्तर होतंच आणि सर्व देशाच्या अस्मितेला फुलवणारा हा निर्णय होता. अमाप पैसा खर्च करून केवळ दीडच वर्षाच्या काळात हे अप्रतिम शिवमंदिर आकाराला आलं हा केवळ एका व्यक्तीच्या आग्रहाचा प्रश्न नसून सर्व राष्ट्रालाच त्याचा अभिमान असणं आवश्यक आहे. हे सरदार जाणून होते. म्हणूनच या मंदिरात शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठा करण्याकरता आले होते. भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद आणि या पूजेचे अध्वर्यू होते नाणावलेले पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. वस्तुत: या कार्यक्रमाला राजेंद्रप्रसादांनी जाऊ नये अशी पंडित नेहरूंची इच्छा होती परंतु कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता केवळ आपल्या विवेकबुद्धीला साक्षी ठेवून डॉ. राजेंद्रप्रसाद या समारंभाला उपस्थित राहिले.

बहुसंख्य लोकांच्या भावना जाणून घेऊन त्याला शासनानेही कणखरपणे पाठिंबा दिला तर वरवर क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे वाटणारे असे प्रश्न चुटकीसरशी सुटू शकतात हेच जणू सरदार पटेल आणि राजेंद्रप्रसाद यांनी दाखवून दिले होते. सोमनाथच्या मंदिराचा जीर्णोद्धार हे एक सांस्कृतिक व नैतिक कर्तव्य आहे हे उमगल्यामुळेच ते घडू शकले. आज परदास्याच्या खुणा पुसून टाकून ताठपणे वर मान करून सोमनाथचं मंदिर मोठ्या दिमाखात उभं आहे. लाखो भाविकांना अंतरिक समाधान देत आहे.

सोमनाथच्या जीर्णोद्धाराने हिंदुस्थानच्या अस्मितेला फुलविलं खरं पण हजारो वर्षांच्या काळात हिंदूधर्मातील काही कुप्रथा व जातिभेदाच्या आगीत होरपळणाऱ्या लाखो



**मनुष्यामध्ये मुळातच असलेल्या देवत्त्वाचे प्रकटीकरण म्हणजे धर्म होय.**

बांधवांनी एक असा निर्णय घेतला की ज्यामुळे खरोखरच हिंदूंनी आत्मपरीक्षण करणं अत्यावश्यक ठरावं. अध्यात्म आणि विशाल अद्वैत तत्त्वज्ञानाची देणगी ज्या हिंदूधर्माने जगाला दिली त्याच धर्मात स्पृश्यास्पृश्यता, जातिभेद, विटाळ अशा अति संकुचित मने घडविणाऱ्या रूढीही निर्माण झाल्या होत्या. महार, मांग, बेरड अशा कैक जातीतील लोकांना जनावरांहून हीन मानलं जातं होतं. आधुनिक शिक्षणामुळे या समाजातील शिक्षित तरुणांची पिढी या अन्यायाविरुद्ध दाद मागू लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशाच शिक्षित तरुणांचे प्रतिनिधी ! अत्यंत कष्टाने, केवळ स्वकर्तृत्वावर विद्वत्ता व जनमान्यता प्राप्त केलेले आंबेडकर दलितांना आपले नेते न वाटले तरच नवल ! दलितांचे शोषण सर्वांसमोर यथार्थपणे मांडणारे बाबासाहेब जणू त्यांचे दैवतच होते. वर्षानुवर्षाच्या संघर्षानंतरही हिंदू समाजातील एक मोठा भाग या दुष्ट रूढींपासून दूर होत नाही हे पाहून अखेर बाबासाहेबांनी या धर्माचाच त्याग करायचा निर्णय केला. 'जो धर्म आपल्याच छायेतील काहींना त्याज्य, अस्पृश्य ठरवितो त्या धर्माची आणि त्या देवदेवतांची चाड मी कशाला बाळगू?' असा प्रश्न उद्वेगाने ते विचारू लागले. अखेर विजयादशमीच्या दिवशी (१४ ऑक्टोबर १९५६) त्यांनी व त्यांच्या लाखो अनुयायांनी नागपूरच्या मैदानावरील जाहीर सभेत बौद्ध धर्माचा अंगीकार केला. त्यांना कुणीतरी डिवचण्याकरिता विचारले, ''बाबासाहेब, हिंदूधर्म सोडायचा तर ख्रिश्चन किंवा मुस्लिम धर्म का नाही स्वीकारला?'' यावर बाबासाहेबांनी सडेतोडपणे उत्तर दिले, ''संत श्री गाडगे महाराजांशी झालेल्या चर्चेनंतर मला जाणवले की धर्म त्यागला तरी माझ्या संस्कृतीच्या पाशांनी मला बांधले आहे. बौद्ध धर्म हा विचारांनी, तत्त्वांनी हिंदुत्वाला सर्वांत निकटचा आहे आणि त्याचे मूळही हिंदुत्वातच आहे!''

पण निश्चितच ह्या 'धम्मचक्र प्रवर्तन दिना'मुळे निद्रावस्थेतील हिंदुसमाजाला एक धक्का बसला. विचारी लोक अंतर्मुख झाले. १९ व्या शतकातील समाजसुधारक ज्योतिबांपासून – राष्ट्रपिता गांधींपर्यंत अनेकांनी जातीभेदाला नष्ट करण्याचे प्रयत्न करूनही लाखो बांधव अद्याप हिंदुसमाजात खऱ्या अर्थाने एकरूप झाले नाहीत म्हणूनच हे घडले ! याचा अर्थ प्रयत्न कमी पडले. सामाजिक समरसतेकरता अधिक जोमाने, समर्पण वृत्तीनं काम केलं पाहिजे !' ही जाणीव प्रकर्षाने लोकांना झाली. शासनालाही झाली. त्या दिशेने काही भरीव प्रयत्नही सुरू झाले परंतु अद्यापही सर्वसामान्य जनतेने आपली मने या समरसतेकरता पूर्णपणे खुली केलेली नाहीत. तळाच्या जनतेला वर यावयाचं असेल तर शिखरावरील लोकांनीही चार पावलं खाली उतरून मदतीचा आश्वासक हात दिला पाहिजे. ह्याची जाणीव अजून म्हणावी तशी जागी झालेली नाही. राजकीय पटावरील खेळींनी तर या समस्येला एक वेगळंच धगधगतं रूप प्राप्त करून दिलं आहे. स्वातंत्र्याच्या ह्या पहिल्या दशकातच गांधीजींचे पट्टशिष्य विनोबा यांनी भूदानाची एक निराळीच संकल्पना वापरून अभिनव प्रात्यक्षिक दिलं. त्याचप्रमाणे दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे ब्रिटीश काळातील प्रांतरचना बदलून झालेली भाषावार प्रांतरचना! या दोन्ही घटनांना मोठी पार्श्वभूमी होती आणि त्यांचे परिणामही कैक वर्षे जनमानसावर होत राहिले. या दोन्हीची माहिती आपण पुढील लेखात घेऊ.

**

(मागील अंकात महात्मा गांधींची हत्या २ ऑक्टोबर १९४८ या दिवशी झाली असे चुकून छापले गेले होते. प्रत्यक्ष ही तारीख ३० जानेवारी १९४८ अशी हवी. चुकीबद्दल आम्ही दिलगीर आहोत.)

सरहद्द गांधीसारखी उंची नाही, चंद्रशेखर आझादांसारखी रुंद छाती नाही. पंडित जवाहरलाल यांच्यासारखे राजबिंडे रूप नाही. राजगोपालाचारी सारखी तीक्ष्ण बुद्धी नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखी काळ्यापाण्यातही बहरणारी काव्यप्रतिभा नाही . . . . . पण सर्वसामान्यांची सर्वसामान्य गुणवत्ता घेऊन जन्मास आलेले मोहनदास गांधी जगातील असामान्य व्यक्तींमध्ये प्रथमस्थानी कसे पोहोचले? एक पापभीरू माणूस महात्मा बनला तो कशामुळे?

**जबरदस्त मेहनत, स्वीकारलेल्या तत्त्वासाठी हवं तेवढं सोसण्याची तयारी आणि लोकसंग्रह या त्रिसूत्रीच्या आधारावर मोहनदास गांधींचं व्यक्तिमत्त्व महात्मा होण्याइतकं विकसित झालं!**

भारतातील गरिबी पाहून 'अरेरे ! काय हे दारिद्र्य! म्हणून उद्‌गार अनेकांचे निघतात पण गरिबीत वाटेकरी होण्याचं साहस क्वचितच दिसतं. गांधींनी ते दाखवले २० हात लांबींचं पागोटं पूर्वीच सोडलं होतं. आता ३ आण्याची टोपी, धोतर व सदरा यांचा त्याग करून पंचा वापरण्यास प्रारंभ केला. इंग्लंडचा राजा असो की गव्हर्नर जनरल. त्यांना भेटण्यासाठी या पंचावरच जायचा आग्रह, तोही इंग्लंडसारख्या थंड प्रदेशात एक गांधीच धरू शकतील.

परचुरे शास्त्रींसारख्या कुष्ठरोग्याच्या जखमा स्वहस्ते धुण्याचे साहस गांधींजवळ होतं म्हणून ते सामान्य असून असामान्यत्वाकडे वेगाने जात राहिले. गोलमेज परिषदेत लंडनला गेले तरी तेथील कामगार वस्तीत व दिल्लीत आले तरी तेथील भंगी वस्तीत राहण्याचा आग्रह म्हणजे उच्च तत्त्वाचा सामान्य जीवनात गांधींनी घडवलेला साक्षात्कार होता.

२ ऑक्टोबर . . . . गांधीजयंती! त्या निमित्ताने महात्मा गांधीजींना अधिक समजावून घेऊयात. त्यांचे 'सत्याचे प्रयोग' हे आत्मचरित्र जरूर मिळवून वाचा. स्वत:च्या अनेक उणीवा अन् मर्यादांवर मात करून छोट्या छोट्या अशा अगणित प्रसंगांमधून गांधीजी खूप काही शिकवून जातात. त्या सर्वांमधून प्रेरणा घेऊन आपणही आपल्यातील असामान्यत्व ओळखूयात. विकसित करूयात. हेच त्यांचे खरे स्मरण होईल.

✻ ✻

*(पान क्रमांक ३४ वर पुढे चालू)* **शिवथरघळची अविस्मरणीय सहल**

सरांबरोबर एक वाटाड्याही होता. पाऊण तासात त्याने आम्हाला हिर्डोशीत पोहोचवले. स्टँडवर गरमागरम पाव सँपल खाऊन आम्ही सर्वजण टेम्पोत बसून पुण्याच्या दिशेने निघालो. टेम्पोमध्ये सरांनी त्यांच्या दोन तासांच्या वाट शोधण्याच्या प्रवासातले अनुभव सांगितले. कीर्र जंगलात घुसणे, घसरणे – धडपडणे अन् इतर कितीतरी . . . . सरांनी ते ९ वीत असताना एका सहलीत जंगलात कसे चुकले होते ते अन् तिथले अनुभवही रंगवून सांगितले.

खूप मोठा पराक्रम अन् साहस करून मोठ्या आत्मविश्वासाने पहाटे ३.०० वाजता आम्ही प्रबोधिनीत आलो. उपासनामंदिरात लगेचच झोप लागली. सकाळी सर्वजण घरी गेलो. एका अनपेक्षितपणे आलेल्या प्रसंगाला न डगमगता, धीर न सोडता, कसं तोंड द्यायचं हे यातून शिकलो. आयुष्यभर लक्षात राहील अशी ही सहल खरोखरीच अविस्मरणीय झाली.

✿ ✿

# तेव्हाचे शिक्षण आत्ताचे यश

– श्री. अविनाश धर्माधिकारी, आय. ए. एस., पुणे

शनिवार १९ जून ९३ चा दिवस ! हा महिन्यातील तिसरा शनिवार – म्हणजे आमचा कामाचा दिवस असतो. प्रत्येक महिन्याचा तिसरा शनिवार राखून ठेवलेला असतो. तो जिल्ह्यातील सर्व बँकांना एकत्र सभा, ऑफिसचे काम आणि कोणत्याही नागरिकांसाठी. अशा दिवशी नाही म्हटलं तरी दुपार उतरून गेली की उद्याच्या सुट्टीचे वेध लागणं सुरू होतं. माझ्यासाठी रविवार म्हणजे घरी बसून शांतपणे आणि निवांतपणे पण एकाग्र मनाने कागदपत्रांशी मस्ती करणे. हे शिक्षण आणि ही सवयसुद्धा प्रबोधिनीतल्या विद्यार्थी दशेतून चालत आलेली. तर अशा या, निवांतपणाकडे झुकू लागलेल्या शनिवारी अचानक एक बातमी येऊन अक्षरश: धडकली. कॅनॉल फुटला ! कॅनॉल फुटला !! संपूर्ण पुणे शहराला पाणीपुरवठा खडकवासला धरणातून होतो. धरणापासून शहरापर्यंत कॅनॉलने पाणी आणलं जातं. तो कॅनॉल शहराच्या बाहेरच एका ठिकाणी फुटला. सुमारे सत्तर फूट रूंदीचं मोठं भगदाड पडून जवळच्या शेतातच सर्व पाणी घुसू लागले. हे लक्षात आल्यावर धरणातूनच पाणी सोडण्याचे थांबविण्यात आले. म्हणून त्या शेतातला आणि जवळच्या वस्तीतला जलप्रलय टळला. कॅनॉल कोरडा पडला आणि संपूर्ण पुणे शहराच्याच घशाला कोरड पडली. सुमारे तीस लाख लोकसंख्येच्या तोंडचं पाणी पळालं. अक्षरश: १९६१ साली एकदा पानशेतचं धरण फुटलं होतं तेव्हा एक मोठं संकट या शहरावर आलं होतं. तेवढंच मोठं पण वेगळ्या प्रकारचं संकट आता ओढवलं. १९६१ मध्ये शहराचा पाणीपुरवठा परत सुरू व्हायला चार दिवस गेले होते. आता आव्हान होतं की चोवीस तासात परत पाणी पुरवठा सुरू व्हायला हवा.

किती प्रसंग असे डोळ्यासमोर उभे राहिले. समोर एक अवघड वाटणारी डेड–लाईन. की अमुक काम चोवीस तासात पूर्ण करायचंय. शिवापूरच्या आपल्या यंत्रशाळेची सुरुवात ७१ च्या जानेवारीत झाली. उद्घाटनाच्या चोवीस तास आधीपर्यंत उघड्या बोडक्या माळरानावर शिवापूरला काही लोखंडाचे सांगाडे होते फक्त. मी त्या वेळी ७ वीत होतो. मोठ्या कार्यकर्त्यांबरोबर मग रात्रभर राबराब राबलो. उद्घाटनाच्या वेळेपर्यंत एक यंत्रशाळा – जिथे दीडशे कर्मचारी बांधव काम करणार होते– अशी उभी करून झाली. त्यात माझा वाटा खारीचा. असंच गुंजवणी नदीच्या खोऱ्यात करंजावणे इथे खांडसरी साखरेचा कारखाना उभा करताना अशक्यप्राय वाटणाऱ्या मुदतीत काम पूर्ण करून दाखवण्याचं प्रशिक्षण. आप्पा त्याला म्हणायचे – **नाहीचं 'हो' करून दाखवण्याची हिंमत!** शारीरिक शिक्षणाची हिवाळी शिबिरं असायची. तर सकाळी ६.३० वाजता उपासना मंदिरापासून रस्त्यावर संचलनासाठी येऊन उभे रहायला मोजून २० सेकंद ! बूट घालायचे अन् पळत

रस्त्यावर विसाव्या सेकंदाला. मिनिटाला १४० पावलं या गतीने संचलन सुरू. संचलनाचा हा वेग भारतीय लष्करातल्या मराठा लाइट इन्फंट्रीचा असतो. आम्हाला संचलन शिकविणारे होते याच इन्फंट्रीतले निवृत्त मेजर. अशी वेळेशी स्पर्धा, खरीतर स्वत:शीच स्पर्धा. की बुवा नकाशावर फुटपट्टी ठेवून एक ट्रेक ठरवायचा महाबळेश्वर ते सज्जनगड. सरळ अंतर चाळीस किलोमीटर. मध्ये डोंगर दऱ्या अनेक पण पार करून तिसऱ्या दिवशी दु. १२.०० पूर्वी सज्जनगडावर पोहोचायचं. असे खूप प्रसंग.

सर्कशीत ट्रॅपिझवर जो कसरत करतो ना. जमिनीवर दीडशे फुटावर अशक्यप्राय वाटणारे प्रकार – आपण श्वास रोखून बघत असतो. माणूसच हे करू शकतो हे आपल्याला पटत नाही. तो ट्रॅपिझवरचा कलाकार सर्व कसरती शिकला. प्रथम जमिनीपासून ५ फुटावर लावलेल्या झोक्यावर ! तसं होतं हे सगळं प्रशिक्षण! किंवा पोहायला शिकताना आपण आधी डबा बांधून तेही ४ फुटातच हातपाय मारतो तसं !

पण आता डोळ्यांसमोर जबडा वासून होतं एक सत्तर फुटी भगदाड आणि पाण्याचा टिपूस उरलेला नाही असं पुणे शहर आणि हाताशी अन् भोवती काम करणारी मोठी यंत्रणा. अशावेळी सर्वांनी मिळून कामाला लागणं महत्त्वाचं असतं. हिंदी पिक्चरच्या हीरो सारखं एकटंच हिरोगिरी करायची नसते. संघभावना महत्त्वाची. तेव्हा पोलीस, महसूल, पाटबंधारे अशी अनेक खाती, सैन्य, होमगार्ड असे मदतीला आणि अनेक नगरसेवक, आमदार, मंत्री स्वत: असे मुळी कॅनॉलवरच ठिय्या देऊन बसले. १९ जूनच्या रात्री दिवस उजाडला! शेजारचा एक पर्यायी कॅनॉल रात्रीत चालू करायचा या कामाला सगळेच लागले तो कॅनॉल वापराच्या अभावी पार निरूपयोगी झाला होता. रात्रीत त्यातली माती उपसून त्याची दारे उघडून सकाळी शहराकडे पाणी धावायला हवं. प्रकाशाचे झोत टाकणारे मोठे दिवे लागले. माणसं आली, मशिनरी आली, कामाला लागली. हे संध्याकाळी ६ च्या सुमारास, रात्रभर काम चालू. पिठलं भाकरीचं जेवणही सगळे एकत्रच जेवले. भोवतीच्या गडद अंधारात लांबून उजळलेल्या, उत्साहानेच ओसंडून वहात असलेल्या त्या जागेचं दृश्य मस्तच दिसत होतं. पुण्याच्या अनंत चतुर्दशीच्या मिरवणुकीच्या रात्री बेलबाग चौकात असतं तसं दृश्य! इथे प्रश्न फक्त चौकातून गणपती पुढे सकरण्याचा नव्हता, पर्यायी कॅनॉलमधून तीस लाखांसाठी पाणी पुढे सरकण्याचा होता.

सकाळी साडेसातला पाटबंधारे खात्याच्या तंत्रज्ञांसमवेत आम्ही ठरविलं की आता वर धरणातून पाणी सोडायला हरकत नाही, ठीक ९ वाजता, भगदाड टाळून, पर्यायी कॅनॉल मधून गढूळ का असेना – पण पाणी पुण्याकडे धावू लागलं.

✿ ✿

(या लेखमालेच्या निमित्ताने श्री. अविनाश धर्माधिकारी यांना आपल्याला काही विचारायचे असेल तर छात्र प्रबोधनच्या पत्त्यावर संपर्क साधावा.)

## १० वी अभ्यास मार्गदर्शन पुस्तिका

१० वी म्हणजे शालांत परीक्षा ! आत्ताची परीक्षापद्धती जरी बुद्धीच्या सर्व गुणांना वाव देणारी नसली तरी आपल्या सर्वांना अजून काही वर्षे तरी (काही वर्षांनंतर त्यात स्वागतार्ह बदल होतील अशी आशा करूयात.) याच परीक्षापद्धतीतून यशस्वीपणे पुढचा मार्ग आक्रमायचा आहे. त्यामुळे परीक्षा तंत्र समजून घ्यायलाच हवे अन् त्याच बरोबर अभ्यासाच्या विविध पद्धती अन् तंत्रांचाही वापर करून बघायला हवा. या सर्वांसाठी सुमारे ८० पानांची एक अभ्यास मार्गदर्शन पुस्तिका १५ डिसेंबर ९३ पर्यंत प्रकाशित होत आहे. प्रामुख्याने १० वी च्या विद्यार्थ्यांना येत्या तीन महिन्यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने त्यात अनेक महत्त्वाचे विषय हाताळले आहेत.

- *वेळेचं, अभ्यासाचं नियोजन कसं करावं?*
- *लक्षात राहण्यासाठी विविध प्रकारचे तक्ते कसे तयार करावेत?*
- *पाठांतर कसे करावे?*
- *विषयांनुसार अभ्यासपद्धतीत कोणकोणते बदल करावेत.*
- *कंटाळा घालविण्यासाठी काय करावे?*
- *अभ्यासाची परिणामकारकता कशी वाढवावी?*
- *प्रयोग परीक्षेची तयारी कशी करावी?*
- *प्रश्नपत्रिका सोडविण्याच्या विविध पद्धती व त्याचे फायदे कोणते?*
- *शेवटच्या आठवड्यात अन् परीक्षेच्या आदल्या दिवशी अभ्यासाची उजळणी कशी करावी?*
- *उत्तरपत्रिका कशा लिहाव्यात?*

१इ. सारखे विषय या पुस्तिकेत असणार आहेत.

**किंमत रु. २५/-**

**सभासदांसाठी सवलतमूल्य रु. २०/-**

**सभासदांनी आपला पावती क्रमांक कळवणे/सांगणे आवश्यक आहे.**


**छात्र प्रबोधन**

हे मासिक **'ज्ञान प्रबोधिनी'** या संस्थेच्या मालकीचे असून सौर आश्विन १, शके १९१५ (२३ सप्टेंबर, १९९३) या दिवशी प्रभात प्रिंटींग प्रेस, गुलटेकडी येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.

**संपादक, प्रकाशक**

श्री. महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**

महेंद्र सेठिया, B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे, M.Sc., B.Ed.
अनघा लवळेकर, M.A., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.

**रेखाचित्रकार**

श्री. दीपक संकपाळ

**संपर्क**

**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ,
पुणे 411 030.
४३२६९१

**मुद्रक**


प्रबोध संपदा,
पुणे 411 002.

**नोंदणी क्रमांक**

PHM/153/VIII

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन PNCW/349 तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

# प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया



*प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया,*
*समर्थ मायभूमीला जगी करावया ।।धृ ।।*

*खेळ खूप खेळुनि सतेज व्हायचे,*
*रोज नवे ज्ञानदिवे चेतवायचे*
*सुरेख लेखना, उदंड वाचना,*
*स्फूर्ती घेऊ या, या यशाकडेच जाऊ या ।।१ ।।*



*फूल फूल गुंफूनीच माळ होतसे,*
*थेंब थेंब झेलुनी झरा वहातसे,*
*मोकळ्या मनी, प्रेम फुलवुनी,*
*माळा गुंफूया, या साखळी जोडू या ।।२ ।।*



*हातचे न हात हे कधी सुटायचे,*
*बिकटवाट ही तरी पुढेच जायचे*
*ना रुसायचे, सदा हसायचे,*
*गीता गाऊ या, या प्रेरणा घेऊ या ।।३ ।।*



*मान मायभूमीची जगात उंचवू,*
*जेथ जाऊ तेथ तेथ विजय मेळवू,*
*जिद्द जागवू, मशाल पेटवू,*
*ही हाक ऐकून या, या ज्योत घेऊ या ।।४ ।।*

❑ संपर्क पत्ता ❑
संपादक, 'छात्र प्रबोधन',
ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ,
पुणे 411 030.
☎ : ४३२६९१
कार्यालयाची वेळ : स. १० ते १२,
संध्या. ५ ते ७.
वार्षिक वर्गणी : रुपये ४०/- फक्त.